दैनिक
समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ७ वे अंक –७२ बुधवार दि.१८ नोव्हेंबर २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-7th Issue- 72 Wednesday, Dt.18 November 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

खो-खोच्या मैदानावर नियमांचा मुडदा..!

शर्मा पुत्रासाठी पंचांचा 'महापराक्रम', जालन्याच्या संघावर अन्याय..!!

एका गुणाच्या फरकाने निकाल, खेळाडूंच्या जन्मतारखांपासून प्रवेश प्रक्रियेपर्यंत संशयाचे सावट, पंचांच्या निर्णयांवरही प्रश्नचिन्ह, जिल्हाधिकाऱ्यांसह क्रीडा आयुक्तांनी चौकशी करण्याची मागणी

बीड । वैभव स्वामी

खेळाच्या मैदानावर खेळाडूंच्या कौशल्याला, मेहनतीला आणि गुणवत्तेला संधी मिळायला हवी. मात्र छत्रपती संभाजीनगर विभागीय खो-खो स्पर्धेत नियम, पारदर्शकता आणि क्रीडाभावनेलाच हरताळ फासला गेल्याचा प्रकार बीडमध्ये घडला आहे.भारतीय खो-खो महासंघाचे खजिनदार गोविंद शर्मा यांच्या मुलाला खेळवण्यासाठी पंचांपासून ते संबंधित प्रशासकीय यंत्रणेपर्यंत काहींची विशेष धडपड सुरू होती का ? जालन्याच्या संघाला ठरवून पराभूत करण्यात आले का ? आणि खेळाडूंच्या जन्मतारखा व शैक्षणिक प्रवेश प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाली आहे का ? असे एकामागून एक गंभीर प्रश्न या स्पर्धेच्या निमित्ताने उपस्थित झाले आहेत.

दिनांक २८ ऑक्टोबर २०२६ रोजी बीड शहरातील तेलगाव नाका परिसरातील राजर्षी शाहू कन्या शाळेत छत्रपती संभाजीनगर विभागस्तरीय खो-खो स्पर्धा पार पडल्या. यामध्ये १९ वर्षांखालील गटात जालना विरुद्ध छत्रपती संभाजीनगर हा सामना विशेष चर्चेचा विषय ठरला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या संघात न्यू हायस्कूल, लासूर स्टेशन या शाळेचा खेळाडू तनिष्क शर्मा सहभागी होता. तो भारतीय खो-खो महासंघाचे खजिनदार गोविंद शर्मा यांचा मुलगा असल्याने या सामन्यात नियमांची अंमलबजावणी सर्वांसाठी समान होती का ? असा सवाल उपस्थित होत आहे.

सामना अवघ्या एका गुणाच्या फरकाने छत्रपती संभाजीनगर संघाच्या बाजूने लागला. मात्र या निकालामागे खेळाडूंचे कौशल्य होते की पंचांच्या वादग्रस्त निर्णयांचा प्रभाव, याची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. सामन्या दरम्यान पंचांनी दिलेल्या निर्णयांचे व्हिडिओ उपलब्ध असल्याचा दावा करण्यात येत असून, त्यामध्ये जालन्याच्या खेळाडूंना जाणीवपूर्वक बाद ठरवण्यात आले. तर त्यांच्या विरोधातील संघातील खेळाडूंच्या काही प्रसंगांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून त्यांना अभय देण्यात आल्याचा आरोप आहे. काही प्रसंगांत खेळाडूंचा स्पर्श स्पष्ट दिसत असतानाही नाबाद ठरवण्यात आले, तर दुसरीकडे जालन्याच्या खेळाडूंविरुद्ध तुलनेने दूरवरून स्पर्श झाल्याचे निर्णय देण्यात आल्याचे व्हिडिओच्या आधारे सांगितले जात आहे.पंचांचा निर्णय की पक्षपातीपणा ? आता व्हिडिओच देणार साक्ष.!

खो-खोमध्ये पायाचा स्पर्श, खो देण्याची पद्धत, आक्रमकाची हालचाल



खेळाडूंच्या जन्मतारखांचा 'चमत्कार'

दोन सख्ख्या भावांच्या जन्मात अवघे २५ दिवसाचे अंतर.?

या प्रकरणातील सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे खेळाडू आकाश जयचंद चव्हाण याच्या जन्मतारखेबाबत उपस्थित झालेला संशय. उपलब्ध कागदपत्रे आणि स्पर्धेच्या याद्यांनुसार या खेळाडूची जन्मतारीख वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळी दाखवण्यात आल्याचा आरोप आहे.मूळ शालेय जनरल रजिस्टरमध्ये २००७ अशी जन्मतारीख असताना त्यात बदल करून २००९ आणि त्यानंतर २०१० अशी नोंद करण्यात आल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे या बदलासंदर्भात उपसंचालकांच्या पत्राचाही उल्लेख करण्यात येत असून, दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर जन्मतारखेत बदल करण्याची परवानगी कोणत्या नियमांतर्गत देण्यात आली, हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे संबंधित खेळाडूच्या भावाच्या कागदपत्रांमध्ये आईचे नाव बबीता आणि जन्मस्थळ दूधनी, अक्कलकोट असेच असल्याचे सांगितले जाते. मात्र एका भावाची जन्मतारीख ३० जून २०१०, तर दुसऱ्याची ५ जून २०१० अशी नोंद असल्याचा दावा करण्यात आला आहे. म्हणजेच एकाच आईच्या दोन सख्ख्या मुलांच्या जन्मामध्ये अवघ्या २५ दिवसांचे अंतर ? या नोंदींची सत्यता तपासणे आवश्यक असून, संबंधित जन्मनोंदणी आणि शालेय दस्तऐवजांची स्वतंत्र पडताळणी झाली पाहिजे.



दोन महिन्यांत बारावीवरून अकरावीत प्रवेश.? एकाच खेळाडूचे दोन जिल्ह्यांत प्रवेशाचे गूढ.!

या प्रकरणात आणखी एक गंभीर विसंगती समोर आणण्यात आली आहे. दोन महिन्यांपूर्वी झालेल्या दुसऱ्या स्पर्धेच्या पुणे जिल्हा खो-खो संघाच्या खेळाडू यादीत आकाश चव्हाण याचे नाव सहाव्या क्रमांकावर असून, त्याची जन्मतारीख २००९ आणि वर्ग बारावी असा उल्लेख असल्याचा दावा आहे. या यादीवर महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचा तसेच पुणे जिल्हा सचिवांचा शिक्का असल्याचे सांगण्यात येते.दुसरीकडे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या खेळाडू आयडी यादीत त्याच खेळाडूची जन्मतारीख २०१० आणि वर्ग अकरावी दाखवण्यात आल्याचा आरोप आहे.

मग दोन महिन्यांपूर्वी बारावीमध्ये शिकणारा विद्यार्थी पुन्हा छत्रपती संभाजीनगरमध्ये अकरावीचा विद्यार्थी कसा झाला ? त्याचे दोन वेगवेगळे प्रवेश कसे झाले ? त्याने दोन शाळांचे निर्गम दाखले घेतले का ? प्रवेशासाठी कोणती कागदपत्रे सादर केली ? या सर्व प्रश्नांची उत्तरे संबंधित शिक्षण विभाग आणि खो-खो संघटनेने देणे गरजेचे आहे.शालेय जनरल रजिस्टरच्या सत्यप्रतीमध्ये जन्मतारखेच्या नोंदीत खोडाखोड झाल्याचा आरोपही करण्यात आला आहे. संबंधित शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षण विभागातील अधिकारी आणि जन्मतारखेत बदलास मान्यता देणाऱ्या यंत्रणेची भूमिका तपासल्याशिवाय सत्य बाहेर येणार नाही.

क्रीडा विभागाने कागदपत्रांची पडताळणी केली की केवळ कागदपत्रे स्वीकारण्याची औपचारिकता पार पाडली.?

शासनाच्या नियमांनुसार खेळाडूंच्या प्रवेश निर्गम जनरल रजिस्टरचे मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीसह साक्षांकित सत्यप्रत सादर करणे आवश्यक असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. मात्र छत्रपती संभाजीनगर संघाच्या खेळाडूंच्या बाबतीत आवश्यक सत्यप्रती न घेता केवळ प्रवेश निर्गम उताऱ्यांच्या आधारे पात्रता स्वीकारण्यात आल्याचा आरोप आहे.त्यामुळे जिल्हा क्रीडा अधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी कोणत्या नियमाच्या आधारे खेळाडूंची पात्रता निश्चित केली, याची चौकशी होणे गरजेचे आहे. पुणे, मुंबई, कोल्हापूर, ठाणे आदी जिल्ह्यांतील खेळाडू छत्रपती संभाजीनगरच्या संघात कसे दाखल झाले, त्यांचे प्रत्यक्ष शैक्षणिक प्रवेश कुठे आहेत, ते नियमित महाविद्यालयात उपस्थित राहतात का, याचीही तपासणी व्हावी.

चौकशी होणार की या कथित गैरप्रकारांवरही प्रशासन मौन बाळगणार.?

जालन्याच्या संघाला खरोखरच अन्याय सहन करावा लागला असेल, तर त्यांना न्याय मिळणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. खेळाच्या मैदानावर विजय मिळवायचा असतो तो गुणवत्तेच्या जोरावर कागदपत्रांच्या खेळातून, पंचांच्या कृपेने किंवा पदाधिकाऱ्यांच्या प्रभावातून नव्हे.!आता प्रश्न एकाच सामन्याच्या निकालाचा नाही, तर महाराष्ट्रातील खो-खो खेळाच्या विश्वासार्हतेचा आहे. चौकशी होणार की या कथित गैरप्रकारांवरही प्रशासन मौन बाळगणार.?

दादेगाव,बीडसांगवी व धनगरजवळका येथे विद्युत विकासकामांचा

गुरुवारी आ.सुरेश आण्णा धस यांच्या शुभहस्ते भूमिपूजन शुभारंभ



आष्टी / (एस.राजेंद्र लाड)

महावितरण कंपनीअंतर्गत एडीबी योजनेतून आष्टी व पाटोदा तालुक्यातील वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम आणि सुसज्ज करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. या योजनेतून नवीन ३३/११ के.व्ही. विद्युत उपकेंद्र तसेच उच्चदाब वाहिनीच्या कामांचा भूमिपूजन शुभारंभ गुरुवार, दि. १९ नोव्हेंबर २०२६ रोजी मराठवाडा भूषण, लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांच्या शुभहस्ते दादेगाव, बीडसांगवी आणि धनगरजवळका येथे संपन्न होणार आहे. या विकासकामांमुळे संबंधित गावांसह परिसरातील वीज वितरण व्यवस्थेला बळकटी मिळणार असून, नागरिक, शेतकरी आणि व्यावसायिकांना अधिक चांगल्या वीजपुरवठ्याची सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

आष्टी-पाटोदा तालुक्यातील वीज व्यवस्थेला मिळणार नवी ऊर्जा

दादेगाव, ता. आष्टी येथे सकाळी १० वाजता दादेगाव-कोकरेवाडी येथे भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भारतीय जनता पार्टीचे आष्टी मंडळ अध्यक्ष श्री. रमेश गावडे भूषविणार आहेत. त्यानंतर बीडसांगवी, ता. आष्टी येथे दुपारी १२ वाजता महादेव मंदिर परिसरात भूमिपूजन सोहळा पार पडणार असून, या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आष्टी सहकारी दूध संघाचे माजी चेअरमन श्री. संजय नाना गाढवे भूषविणार आहेत. तर तिसरा भूमिपूजन कार्यक्रम धनगरजवळका, ता. पाटोदा येथे दुपारी २.३० वाजता धनगरजवळका-पाटोदा रोडवरील काळे वस्ती येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भारतीय जनता पार्टीचे पाटोदा मंडळ अध्यक्ष श्री. भागवत येवले भूषविणार आहेत. आमदार सुरेश आण्णा धस यांच्या शुभहस्ते होणाऱ्या या तीनही विकासकामांच्या भूमिपूजनामुळे ग्रामीण भागातील वीज वितरण यंत्रणा अधिक सक्षम होण्यास मदत होणार असून, आष्टी-पाटोदा तालुक्याच्या विकासात आणखी एक महत्त्वपूर्ण भर पडणार आहे. या कार्यक्रमांचे आयोजन भारतीय जनता पार्टी आष्टी, पाटोदा व शिरूर (का.) यांच्या वतीने करण्यात आले असून, परिसरातील नागरिक, शेतकरी, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
संपादकीय
बुधवार दि.१८ नोव्हेंबर २०२६
WEDNESDAY, DT.18 NOVEMBER 2026
पान -२
PAGE - 2

संपादकीय....

न्यायालये उघडी पण न्यायप्रक्रिया ठप्प.!

न्याय मागणाऱ्यांनी अखेर दाद कोणाकडे मागायची ?

बीड । विशेष अग्रलेख

न्याय मिळवण्यासाठी माणूस न्यायालयाचे दार ठोठावतो पण त्याच न्यायालयातील कर्मचारी आंदोलनावर गेले, तर सामान्य माणसाने न्याय मागायचा तरी कोणाकडे ? महाराष्ट्रातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी वेतनश्रेणीतील समानतेच्या मागणीसाठी बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करणे चुकीचेच. मात्र या आंदोलनाचा सर्वाधिक फटका सामान्य पक्षकार, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि वर्षानुवर्षे खटल्यांच्या तारखा भोगणाऱ्या नागरिकांना बसणार आहे.

कर्मचाऱ्यांना न्याय्य वेतन मिळालेच पाहिजे. शासनाने त्यांच्या मागण्यांकडे संवेदनशीलतेने पाहिले पाहिजे. परंतु न्यायव्यवस्थेतील कामकाज ठप्प होऊन नागरिकांचा न्याय मिळवण्याचा अधिकारच संकटात येत असेल, तर त्याची जबाबदारी कोण घेणार ? आधीच न्यायालयांमध्ये प्रलंबित खटल्यांचा डोंगर आहे. तारखांवर तारखा, आर्थिक खर्च, मानसिक त्रास आणि न्यायाच्या प्रतीक्षेत आयुष्य घालवणारे पक्षकार ही आपल्या व्यवस्थेची कटू वस्तुस्थिती आहे. अशा परिस्थितीत संपाचा प्रश्न केवळ कर्मचारी आणि शासन यांच्यातील संघर्ष म्हणून पाहून चालणार नाही.शासनाने चर्चेचे दरवाजे उघडावेत, कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा आणि न्यायालयीन कामकाज पूर्ववत करण्यासाठी तातडीने मार्ग काढावा. कारण कर्मचाऱ्यांचा सन्मान आणि नागरिकांचा न्यायाचा अधिकार या दोन्ही गोष्टी समान महत्त्वाच्या आहेत.

न्याय देणारी व्यवस्था कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर अडकता कामा नये आणि कर्मचाऱ्यांचे प्रश्नही अन्यायाने दडपले जाता कामा नयेत. न्यायालयाच्या दारात न्यायच प्रतीक्षेत उभा राहणार असेल, तर लोकशाहीने आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे.!

आत्महत्येची खोटी धमकी देऊन पोलिसांची दिशाभूल करणाऱ्या रोमन विरुद्ध गुन्हा दाखल

बीड (प्रतिनिधी)

चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे आनंदवाडी येथे डायल ११२ या आपत्कालीन पोलीस मदत सेवेचा गैरवापर करून आत्महत्येची खोटी धमकी देत पोलिसांची दिशाभूल करणाऱ्या एका इसमाविरुद्ध चकलांबा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक १६/११/२०२६ रोजी सकाळी ७:०० वाजल्यापासून डायल ११२ नियंत्रण कक्षास मोबाईल क्रमांकावरून वारंवार कॉल करून, मला तात्काळ पोलीस मदत हवी आहे, अन्यथा मी आत्महत्या करेन, अशी माहिती देण्यात येत होती. सदर कॉलचे गांभीर्य लक्षात घेऊन कोणताही अनुचित प्रकार घडू नये व संबंधित व्यक्तीचे प्राण वाचविण्याच्या उद्देशाने चकलांबा पोलीस ठाण्याचे डायल ११२ पथक तात्काळ मौजे आनंदवाडी, ता. शिरूर कासार, जि. बीड येथे पोहोचले.पोलिसांनी कॉल करणाऱ्या व्यक्तीचा शोध घेऊन विचारपूस केली असता, त्याचे नाव अर्जुन लक्ष्मण रोमन, वय ५५ वर्षे, रा. आनंदवाडी, ता. शिरूर कासार, जि. बीड असे असल्याचे निष्पन्न झाले. सदर व्यक्ती मद्यधुंद अवस्थेत असल्याचे आढळून आले. त्याच्याकडे आत्महत्येची धमकी देण्याबाबत विचारणा केली असता, कोणतीही अडचण नसून केवळ दारूच्या नशेत पोलिसांची फिरकी घेण्यासाठी व त्यांना त्रास देण्याच्या उद्देशाने वारंवार खोटे कॉल केल्याचे त्याने सांगितले.

सदर प्रकारामुळे आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या मदतीसाठी तत्पर असलेल्या डायल ११२ या महत्त्वपूर्ण शासकीय यंत्रणेचा वेळ व मनुष्यबळ विनाकारण खर्च झाले. तसेच अन्य गरजू नागरिकांना वेळेत पोलीस मदत मिळण्याच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण होण्याची शक्यता होती.या प्रकरणी पोलीस शिपाई मुकेश बनसोडे यांच्या फिर्यादीवरून आरोपी अर्जुन लक्ष्मण रोमन याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम २१७ अन्वये चकलांबा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चकलांबा पोलीस नागरिकांना आवाहन करतात की, डायल ११२ ही आपत्कालीन सेवा केवळ वास्तविक आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी उपलब्ध आहे. या सेवेवर खोटे कॉल करणे, दिशाभूल करणारी माहिती देणे अथवा सेवेचा गैरवापर करणे टाळावे. अशा प्रकारांमुळे खऱ्या गरजू व्यक्तींना वेळेत मदत मिळण्यास विलंब होऊ शकतो.

पान १ वरून..

खो-खोच्या....

आणि बचावपटूचा बाद होण्याचा क्षण हे अत्यंत महत्त्वाचे असतात. मात्र या सामन्यात काही निर्णयांमध्ये नियमांची समान अंमलबजावणी झाली नसल्याचा आरोप आहे. एका प्रसंगात एकाच खेळाडूला दोन वेळा बाद करण्याची संधी असतानाही पंचांनी त्याला नाबाद ठरवल्याचा दावा आहे. दुसऱ्या प्रसंगात स्पष्ट स्पर्श झाल्यानंतरही खेळाडूला मैदानात खेळू देण्यात आल्याचे व्हिडिओत दिसत असल्याचे सांगितले जाते.

स्पर्धेच्या निष्पक्षतेवरच प्रश्नचिन्ह ?

जालन्याच्या संघाच्या समर्थकांनी आणि उपस्थित प्रेक्षकांनी पंचांच्या निर्णयांवर तीव्र नाराजी व्यक्त केली. काही प्रेक्षकांनी पंचांना जाब विचारत सामना ठरवून खेळवला जात असल्याचा आरोप केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे हा केवळ मैदानावरील निर्णयांचा विषय राहिलेला नसून स्पर्धेच्या निष्पक्षतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या मुलांसाठी स्वतंत्र नियम आहेत काय ?

खेळात पद, पैसा, राजकीय वजन किंवा संघटनेतील अधिकार यापेक्षा गुणवत्ता महत्त्वाची असते. मात्र एखाद्या वरिष्ठ पदाधिकाऱ्याचा मुलगा मैदानात असल्यामुळे पंच आणि अधिकारी दबावाखाली काम करत असतील, तर ही केवळ एका सामन्यापुरती बाब नाही तर संपूर्ण क्रीडा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेला लागलेला धक्का आहे. जालन्याच्या संघाने मेहनतीने मैदान गाठले, खेळाडूंनी घाम गाळला परंतु पंचांच्या निर्णयांमुळे आणि संभाव्य कागदपत्रांच्या अनियमिततेमुळे त्यांच्यावर अन्याय झाला असेल, तर संबंधितांना न्याय मिळालाच पाहिजे. या प्रकरणात आर्थिक देवाणघेवाण किंवा पंच-अधिकाऱ्यांच्या संगनमताचे आरोपही व्यक्त होत आहेत. मात्र त्याची सत्यता सक्षम यंत्रणेच्या निष्पक्ष चौकशीतूनच स्पष्ट होऊ शकते.

जिल्हाधिकाऱ्यांनी दखल घ्यावी,

सुनेत्राताई पवार यांनी लक्ष घालावे.!

या संपूर्ण प्रकरणाची बीड जिल्हाधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेऊन जिल्हा क्रीडा अधिकारी, स्पर्धेचे आयोजक, पंच, संबंधित शाळांचे मुख्याध्यापक आणि खेळाडूंच्या पात्रतेची पडताळणी करणाऱ्या अधिकाऱ्यांची भूमिका तपासावी. उपलब्ध व्हिडिओ फुटेज, खेळाडूंच्या मूळ जनरल रजिस्टर नोंदी, जन्मदाखले, शाळा सोडल्याचे दाखले, प्रवेश नोंदी आणि संघटनांच्या अधिकृत याद्या ताब्यात घेऊन चौकशी करावी.महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांनीही या प्रकरणात लक्ष घालून दोषींवर कारवाईसाठी पुढाकार घ्यावा. तसेच क्रीडा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतंत्र चौकशी समिती नेमून या स्पर्धेतील सर्व वादग्रस्त निर्णय आणि खेळाडूंच्या पात्रतेची तपासणी करावी.

रोहयोतून चारा पिकांसाठी आर्थिक मदत व रोजगाराचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा - जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व सीईओ महेश पाटील

नांदेड जिल्हा प्रतिनिधी

दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चारा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने जिल्ह्यात चारा पीक लागवडीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. महाराष्ट्र रोजगार हमी योजनेंतर्गत विकसित भारत रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) अंतर्गत चारा पिकांच्या लागवडीसाठी विशेष आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. या योजनेमुळे पशुपालकांना चारा उपलब्ध होण्यासोबतच ग्रामीण भागातील मजुरांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी मिळणार आहेत. त्यामुळे सिंचनासाठी पाणी उपलब्ध असलेल्या अधिकाधिक शेतकऱ्यांनी चारा पीक लागवड करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी केले आहे.

मृद व जलसंधारण विभागाच्या (रोहयो प्रभाग) ६ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार विविध चारा पिकांच्या लागवडीसाठी रोपे, बियाणे, मजुरी व सामग्री यासाठी आर्थिक तरतूद निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार मका लागवडीसाठी हेक्टरी ४७ हजार ३०७ रुपये व ९५ मनुष्यदिवस, ज्वारीसाठी ४२ हजार ७७८ रुपये व ८८ मनुष्यदिवस, तर बाजरीसाठी ३५ हजार ५०५ रुपये व ७४ मनुष्यदिवस रोजगार उपलब्ध होणार आहे. नेपिअर गवत लागवडीसाठी ७६ हजार ३१ रुपये व १५५ मनुष्यदिवस, मेथी घास (ल्युसर्न) लागवडीसाठी १ लाख १३ हजार २९० रुपये व २७० मनुष्यदिवस, ज्वारी मल्टीकटसाठी ५२ हजार ३६ रुपये व १०० मनुष्यदिवस, तर बाजरी मल्टीकटसाठी ७६ हजार ४५ रुपये व १८० मनुष्यदिवस रोजगाराची तरतूद करण्यात आली आहे.

दुष्काळी परिस्थितीत चारा टंचाईमुळे पशुधनाच्या संगोपनाचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी उपलब्ध सिंचनाच्या पाण्याचा उपयोग करून चारा पिकांची लागवड करणे आवश्यक आहे. या उपक्रमामुळे जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता वाढण्यासोबतच पशुपालकांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. तसेच ग्रामीण भागातील मजुरांना रोजगारही उपलब्ध होणार आहे. त्यामुळे इच्छुक शेतकऱ्यांनी चारा पीक लागवडीसाठी संबंधित पंचायत समिती कार्यालय किंवा पशुसंवर्धन विभागाशी संपर्क साधून योजनेची माहिती घ्यावी व या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

पाच हजार रुपयांच्या अग्रीम मदतीमुळे शेतकरी कुटुंबांना दिलासा

छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड व परभणी जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी व्यक्त केले समाधान

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत जमा केलेली प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत शेतकरी कुटुंबांसाठी मोलाचा आधार ठरली आहे. ऐन दिवाळीच्या काळात मिळालेल्या या मदतीमुळे कुणाला घरातील किराणा सामानाची व्यवस्था करता आली, तर कुणाच्या सणासुदीच्या खर्चाला हातभार लागला. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि परभणी जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी आपल्या प्रतिक्रियांमधून समाधान व्यक्त करत राज्य शासनाचे आभार मानले आहेत.

छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील गाढेजळगाव येथील शेतकरी लक्ष्मण ठोंबरे यांनी शासनाच्या विविध योजनांमुळे आर्थिक आधार मिळाल्याचे सांगितले. आपल्या दोन विहिरींचे कृषिपंप वीजबिल तसेच बँक ऑफ महाराष्ट्रकडील दोन लाख रुपयांचे कर्ज माफ झाल्याचा अनुभव त्यांनी सांगितला. त्यानंतर मिळालेल्या पाच हजार रुपयांच्या अग्रीम मदतीमुळे दिवाळी गोड झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. याच गावातील अर्जुन नामदेव गाडेकर यांनीही अग्रीम मदतीबद्दल समाधान व्यक्त करत शासनाच्या कर्जमुक्तीच्या घोषणेचाही उल्लेख केला.

करमाड येथील शेतकरी आप्पासाहेब पुंडलिकराव उकिरडे यांनी दुष्काळाच्या काळात मिळालेल्या मदतीमुळे दिवाळी आनंदात साजरी करता आल्याचे सांगितले. याच गावातील शिवाजी उत्तमराव उकिरडे यांनी गोरगरीब कुटुंबांसाठी पाच हजार रुपये ही मोठी रक्कम असल्याची भावना व्यक्त केली. करमाड येथील दत्ता पांडुरंग उकिरडे यांनीही गावातील अनेक शेतकऱ्यांना मदत मिळाल्याचे सांगत शासनाच्या कर्जविषयक उपाययोजना आणि वीजबिल सवलतींमुळे दिलासा मिळाल्याचे नमूद केले.

लाडगाव येथील शेतकरी रमेश आबाराव बागल यांनी आपल्यासह पत्नीलाही प्रत्येकी पाच हजार रुपयांची मदत मिळाल्याने दिवाळी गोड झाल्याचे सांगितले. त्याच गावातील भास्कर संपतराव बागल यांनीही दिवाळीपूर्वी मिळालेल्या मदतीमुळे आर्थिक आधार मिळाल्याची भावना व्यक्त केली.जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील वालसावंगी येथील शेतकरी श्रीकांत आखाडे यांनी दुष्काळामुळे यंदा अडीच एकर शेतीतून अपेक्षित उत्पादन मिळाले नसल्याचे सांगितले. अशा परिस्थितीत शासनाने दिलेली अग्रीम मदत मोलाची ठरल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. जालना येथील शेतकरी अंकुश परकाळ यांनी या मदतीतून घरासाठी किराणा सामान खरेदी करता येणार असून दिवाळी साजरी करण्यास हातभार लागल्याचे सांगितले. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्य शासनाचे आभार मानले.बीड जिल्ह्यातील बलगुजार येथील शेतकरी अभिजीत बन्सीधर कदम यांनाही शासनाचे दुष्काळी अनुदान प्राप्त झाले आहे. तसेच बीड जिल्ह्यातील शेतकरी सुशांत गोर आणि बीड तालुक्यातील खडकी घाट येथील अक्षय वाघ व दत्ता दळवी यांच्याही प्रतिक्रिया प्राप्त झाल्या आहेत. जिल्ह्यातील या शेतकऱ्यांच्या अनुभवांचाही दुष्काळी मदतीच्या प्रतिक्रियांमध्ये समावेश आहे.

परभणी जिल्ह्यातील झरी येथील शेतकरी गजानन मोहनराव चव्हाण यांनी दिवाळीपूर्वी मिळालेली पाच हजार रुपयांची मदत मोलाची असल्याचे सांगितले. या मदतीमुळे दिवाळी आनंदात साजरी होणार असल्याची भावना व्यक्त करत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्य शासनाचे आभार मानले. परभणी तालुक्यातील वाडी दमई येथील शेतकरी पंढरी उत्तमराव बारहाते यांनीही आपल्या खात्यात जमा झालेली मदतीची रक्कम समाधानकारक असल्याचे सांगत शासनाचे आभार मानले.दुष्काळी परिस्थितीत शेतकरी कुटुंबांच्या गरजा लक्षात घेऊन दिवाळीपूर्वी देण्यात आलेली अग्रीम मदत अनेकांसाठी उपयुक्त ठरली आहे. काही शेतकऱ्यांनी कर्जमाफी आणि कृषिपंप वीजबिल माफीच्या लाभांचाही आपल्या प्रतिक्रियांमध्ये उल्लेख केला. चारही जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या अनुभवांतून शासनाच्या मदतीमुळे मिळालेला आर्थिक आधार आणि दिवाळीच्या आनंदात पडलेली भर अधोरेखित होत आहे.



आदित्य कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा ग्लोबल विकास ट्रस्ट येथे शैक्षणिक दौरा

आधुनिक शेती पद्धती, प्रगत तंत्रज्ञान आणि शेतीतील व्यावहारिक बाबींचे घेतले ज्ञान

प्रतिनिधी । बीड

आदित्य शिक्षण संस्था संचलित आदित्य कृषी महाविद्यालयाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी शिरसाळा (ता. परळी) येथील 'ग्लोबल विकास ट्रस्ट' येथे एकदिवसीय शैक्षणिक अभ्यास दौरा उत्साहात पार पडला. पुस्तकी ज्ञानापलीकडे जाऊन शेतीचे प्रत्यक्ष धडे गिरवण्यासाठी आयोजित केलेल्या या दौऱ्यात विद्यार्थ्यांनी प्रगत तंत्रज्ञान, कमी खर्चात उत्पादनवाढ आणि शेतीतील व्यावहारिक बारकावे जवळून समजून घेतले. या प्रत्यक्ष अनुभवामुळे भावी कृषी पदवीधरांमध्ये आधुनिक व शाश्वत शेतीचा नवा दृष्टिकोन निर्माण झाला आहे.

परळी तालुक्यातील शिरसाळा येथील 'ग्लोबल विकास ट्रस्ट' येथे एका अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या दौऱ्यातून विद्यार्थ्यांना आधुनिक शेती पद्धती, प्रगत तंत्रज्ञान आणि शेतीतील व्यावहारिक बाबींची प्रत्यक्ष माहिती मिळाल्यामुळे त्यांच्या ज्ञानात मोलाची भर पडली. बदलत्या काळात कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वाढता वापर पाहता, विद्यार्थ्यांना केवळ वर्गखोलीतील शिक्षणावर विसंबून न राहता प्रत्यक्ष शेतीचे प्रात्यक्षिक अनुभव मिळावेत, हा यामागचा मुख्य उद्देश होता. या अभ्यास दौऱ्यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक शेतीचे विविध पैलू अत्यंत जवळून समजून घेण्याची संधी मिळाली. कृषी क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेतीचा खर्च कसा कमी करावा, उत्पादनात कशी वाढ करावी आणि शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न व जीवनमान कसे उंचावता येईल, याबाबत विद्यार्थ्यांनी अभ्यास केला. भविष्यातील शेती ही अधिक ज्ञानाधारित, तंत्रज्ञानस्नेही आणि व्यावहारिक असणे ही काळाची गरज असून, या दौऱ्यामुळे विद्यार्थ्यांना कृषी शिक्षणाचा प्रत्यक्ष शेतीशी असलेला संबंध अचूकपणे समजला. या महत्त्वपूर्ण दौऱ्यात ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने डॉ. प्रवीण मांजरे, प्रा. अक्षय काकडे, प्रा. गणेश मुसळे, दिनेश खानजोडे, गोविंद कोळेकर, मधुकर उंडाळकर, राजाभाऊ कडभाने आणि वैष्णवी नवटके मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी बदलत्या काळानुसार शेतीमध्ये स्वीकारावयाच्या नवीन पद्धती, आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर आणि व्यावहारिक शेतीचे महत्त्व यावर प्रकाश टाकला. तसेच ग्लोबल विकास ट्रस्ट कृषीकुलचे प्रकल्प समन्वयक विजय गव्हाणे यांनी या भेटीला विशेष परवानगी देत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.हा यशस्वी दौरा आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा आणि संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा यांच्या विशेष नियोजनामुळे प्रत्यक्षात उतरला.



महाविद्यालयाचे प्रा. डॉ. धनंजय सातपुते, प्रा. बी. एन. मुंडे, प्रा. प्रिया गव्हाणे आणि प्रा. बोराडकर यांनी विद्यार्थ्यांना संपूर्ण दौऱ्यात मार्गदर्शन करत उत्तम साथ दिली. त्यांच्या या नियोजनबद्ध सहकार्यामुळेच हा दौरा अत्यंत शिस्तबद्ध व यशस्वीरीत्या पार पडला.

विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह

या अभ्यास दौऱ्यादरम्यान विद्यार्थ्यांनी प्रचंड उत्साहाने विविध तांत्रिक बाबींची माहिती जाणून घेतली, तज्ज्ञांना प्रश्न विचारले आणि शेतीतील प्रत्यक्ष अनुभव घेतला. प्रथम वर्षाचा कृषी विद्यार्थी तिरुपती गाडे म्हणाला, ग्लोबल विकास ट्रस्ट येथे आधुनिक शेतीचे प्रयोग प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली. पुस्तकी ज्ञानासोबत व्यावहारिक माहिती मिळाल्यामुळे कृषी क्षेत्राकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोन अधिक व्यापक झाला आहे. पल्लवी खरात हिने सांगितले की, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शेतीतील नवनवीन प्रयोग आणि उत्पादनवाढीसाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांची सविस्तर माहिती या दौऱ्यामुळे मिळाली. भविष्यात या मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग शेतीच्या विकासासाठी नक्कीच करता येईल.

आजच्या काळात कृषी शिक्षण केवळ वर्गखोलीपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शेतीचे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळणे अत्यंत गरजेचे आहे. शिरसाळा येथील या अभ्यास दौऱ्यामुळे विद्यार्थ्यांना शाश्वत व कमी खर्चातील प्रगत शेतीची व्यावहारिक ओळख झाली असून, यातूनच उद्याचे सक्षम कृषी तज्ज्ञ व उद्योजक घडतील.

-डॉ. आदिती सारडा,

संचालिका ,आदित्य शिक्षण संस्था, बीड.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतींना बीडमध्ये अभिवादन.!

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात १४ व्या स्मृतिदिनानिमित्त पदाधिकारी व शिवसैनिकांनी केले अभिवादन

बीड । प्रतिनिधी

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या १४ व्या स्मृतिदिनानिमित्त बीड येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स येथील पक्षाच्या जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात आयोजित अभिवादन कार्यक्रमात पदाधिकारी, महिला आघाडीच्या कार्यकर्त्या आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर, तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, अल्पसंख्याक सेनेचे जिल्हाध्यक्ष आयुब भाई पठाण, अल्पसंख्याक महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ. यासमीन बाजी शेख, युवा सेना उपजिल्हाधिकारी अशपाक भाई शेख, बीड तालुका युवाधिकारी बारिकराव येवले, तालुका सचिव नंदुभाऊ येवले, उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, अशोक सगळे, घुमरे आबा, जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके, तालुका सहसचिव संदीप भानप, राजू माने, संदीप शिंदे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.



शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतींना अभिवादन करत उपस्थितांनी त्यांच्या विचारांचे स्मरण केले. यावेळी शिवसैनिक, महिला आघाडीच्या पदाधिकारी आणि युवासैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या लाडक्या साहेबांना आदरांजली अर्पण केली.साहेबांचे विचार, शिवसैनिकांची निष्ठा आणि संघटनेची बांधिलकी यांचे स्मरण करून देणारा हा अभिवादन सोहळा भावपूर्ण वातावरणात पार पडला.

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .६४७/२०२६
अनिकेत वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय

ज्याअर्थी अर्जदार नामे **अनिकेत भिमराव मोंढे, रा.सुशी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, सुशी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांच्या स्वत: नामे अनिकेत भिमराव मोंढे यांच्या दि.२२/०१/२००४ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक १७/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २६/११/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक.८२७/२०२६
महेश वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड आर.एल.गवारे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **महेश शामराव उदागे, रा.सुशी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, सुशी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांच्या स्वत: नामे महेश शामराव उदागे यांच्या दि.३०/११/२००७ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २१/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१०११/२०२६
अविनाश वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड आर.ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **अविनाश पि. भिमराव सुरनर, रा.चोरपुरी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, चोरपुरी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांच्या स्वत: नामे अविनाश पि. भिमराव सुरनर यांच्या दि.१२/०३/२००० रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २१/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक.१०७५/२०२६
बेगमबी वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड आर.ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **बेगमबी शब्बीर शेख, रा.रांजणी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, रांजणी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची मुलगी नामे शेख सफीया शब्बीर यांच्या दि.३१/०७/२००० रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १४/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .११६३/२०२६
बाबासाहेब वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड आर.ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **बाबासाहेब पि.मसु पवार, रा.देवकी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, रेवकी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची आई नामे राधाबाई भ्र.मसु पवार यांच्या दि.१३/११/२०२५ रोजीची** मृत्यू नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १८/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .८१३/२०२६
नजराना बेगम वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड आर.एल.गवारे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **नजराना बेगम तालेब कुरेशी(वडीलांकडील नाव), नजराना बेगम शफीक कुरेशी(पतीकडील नाव) रा.उमापुर, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, उमापुर, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची स्वत: नामे नजराना बेगम तालेब कुरेशी(वडीलांकडील नाव), नजराना बेगम शफीक कुरेशी(पतीकडील नाव) यांच्या दि.२०/१२/१९८९ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १७/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .११०१/२०२६
प्रल्हाद वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय

ज्याअर्थी अर्जदार नामे **प्रल्हाद नारायण साबळे, रा.मुळुकवाडी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, मुळुकवाडी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची आई नामे शहाबाई नारायण साबळे यांच्या दि.२७/०८/२०२४ रोजीची** मृत्यू नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०५/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १६/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१०७३/२०२६
रुखमीण वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड आर.ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **रुखमीण भ्र.विठ्ठल गंडे, रा.चोरपुरी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, चोरपुरी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांचा मुलगा नामे रविंद्र पि. विठ्ठल गंडे यांच्या दि.३०/०९/२०१९ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १४/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .११६१/२०२६
बाबासाहेब वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड आर.ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **बाबासाहेब पि.मसु पवार, रा.देवकी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, रेवकी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांचे वडील नामे मसु पि बक्षी पवार यांच्या दि.२०/०६/२०१३ रोजीची** मृत्यू नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १८/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१०७८/२०२६
शेख यासमीन वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड एस.एस.काळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **शेख यासमीन शेख जुबेर, रा.गेवराई, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **न.प. गेवराई, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची स्वत: नामे शेख यासमीन शेख जुबेर यांच्या दि. २१/१०/१९९२ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०४/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २९/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१०७६/२०२६
शकिला वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड एस.एस.काळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **शकीला भ्र. उमेर शेख, रा.गेवराई, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **न.प. गेवराई, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची स्वत: नामे शकीला भ्र. उमेर शेख यांच्या दि. १०/०५/२००० रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०४/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २९/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१०७६/२०२६
शकिला वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड एस.एस.काळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **शकीला भ्र. उमेर शेख, रा.गेवराई, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **न.प. गेवराई, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची स्वत: नामे शकीला भ्र. उमेर शेख यांच्या दि. १०/०५/२००० रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २१/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १५/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .८४९/२०२६
पोपट वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड एस.एस.ढोबळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **पोपट रामचंद्र बाबरे, रा.रेवकी-देवकी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, रेवकी-देवकी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची १)मुलगी नामे आरती पोपट बाबरे, २) मुलगा नामे गोकुळ पोपट बाबरे यांच्या दि.०९/०४/२००७ व २०/०५/२००८ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २१/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १५/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१०३९/२०२६
सिदिनाथ वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड एस.एस.ढोबळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **सिदिनाथ पि.महादेव गवारे, रा.महांडूळा, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, महांडूळा, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांचा मुलगा नामे शंभु पि. सिदिनाथ गवारे यांच्या दि.२२/०८/२०२२ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०४/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १६/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१०३७/२०२६
सिदिनाथ वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड एस.एस.ढोबळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **सिदिनाथ पि.महादेव गवारे, रा.महांडूळा, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, महांडूळा, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची मुलगी नामे कार्तीकी पि. सिदिनाथ गवारे यांच्या दि.२८/०७/२०१९ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०४/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १६/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१०७२/२०२६
शेख उमेर पि.शेख अब्दुल रहेमान वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड एस.एस.काळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **शेख उमेर पि.शेख अब्दुल रहेमान, रा.गेवराई, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **न.प. गेवराई, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची स्वत: नामे शेख उमेर पि.शेख अब्दुल रहेमान यांच्या दि. ०६/०४/१९८० रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०४/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २९/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१०८०/२०२६
शेख नजीर अब्दुल रहेमान वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड एस.एस.काळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **नजीर पि.अब्दुल रहेमान शेख, रा.गेवराई, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **न.प. गेवराई, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची स्वत: नामे नजीर पि.अब्दुल रहेमान शेख यांच्या दि. ०१/०१/१९७३ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)

विविध वृत्त

बुधवार दि.१८ नोव्हेंबर २०२६
WEDNESDAY, DT.18 NOVEMBER 2026

पान -४
PAGE - 4

शिवसेनेचा आनंदी शिधा देवून शिवसेना जिल्हाप्रमुख अँड चंद्रकांत नवले यांनी केली तृतीयपंथीयांची दिवाळी गोड..!

पत्रकार शेख आयेशा यांच्या आश्रय सेवाभावी संस्थेचा पुढाकार, एकनाथ शिंदे यांच्यासह शिंदे शिवसेनेचे तृतीयपंथीयांकडून आभार..!!



स्वतंत्र स्मशानभूमीपासून आरोग्य सुविधांपर्यंत विविध मागण्यांकडे लक्ष वेधले

बीड । प्रतिनिधी

दिवाळीचा आनंद प्रत्येकाच्या आयुष्यात पोहोचावा, सणाच्या प्रकाशात समाजातील शेवटच्या घटकाच्याही चेहऱ्यावर हास्य फुलावे, हीच माणुसकीची खरी भावना. याच सामाजिक जाणिवेतून सोमवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी आश्रय सेवाभावी संस्थेच्या वतीने तृतीयपंथीयांना आनंदाचा शिधा वाटप करून त्यांची दिवाळी गोड करण्यात आली. संस्थेच्या अध्यक्ष शेख आयेशा आणि दैनिक समर्थ राजयोगचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या उपस्थितीत तर या सामाजिक उपक्रमासाठी खास पुढाकार घेतलेले शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख अँड. चंद्रकांत आप्पा नवले यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

यावेळी अँड. चंद्रकांत आप्पा नवले यांनी मनोगत व्यक्त करताना महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या माध्यमातून तृतीयपंथीयांसाठी राबविण्यात येणाऱ्या मदतकार्याचा उल्लेख केला. खासदार आनंद परांजपे, संपर्कमंत्री तथा फलोत्पादन व खारभूमी मंत्री, विधिमंडळ उपनेते भरतशेठ गोगावले आणि संपर्कप्रमुख मनोजजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जास्तीत जास्त गरजूंपर्यंत किराणा किट पोहोचविण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी तृतीयपंथीयांनी एकनाथराव शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे आभार व्यक्त करत शुभेच्छा व आशीर्वाद दिले. भविष्यातही सामाजिक उपक्रमांना आपला पाठिंबा राहील, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.आनंदाच्या शिध्याने दिवाळी गोड झाली आता त्यांच्या मूलभूत मागण्यांची पूर्तता होऊन आयुष्यही सन्मानाने उजळावे, हीच या उपक्रमातून व्यक्त झालेली अपेक्षा आहे.माणुसकीच्या नात्याने पुढे आलेला मदतीचा हात आणि हक्कांसाठी उमटलेला आवाज, या दोन्हींची दखल शासनाने घेणे हीच या उपक्रमाची खरी फलश्रुती ठरेल.!

मदतीसोबतच हक्कांचा सन्मानही हवा.!

आनंदाचा शिधा मिळाल्याचा आनंद व्यक्त करतानाच तृतीयपंथीयांनी आपल्या मूलभूत सुविधांचे प्रश्नही मांडले. प्रत्येक जिल्हा आणि तालुका स्तरावर स्वतंत्र स्मशानभूमी उपलब्ध करून द्यावी, सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये स्वतंत्र कक्ष असावा, बस आगारांमध्ये स्वतंत्र स्वच्छतागृहांची व्यवस्था करावी, तसेच जिल्हा शासकीय रुग्णालयांमध्ये आवश्यक शस्त्रक्रिया विनामूल्य करण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशा महत्त्वपूर्ण मागण्या आश्रय सेवाकेंद्राच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याकडे करण्यात आल्या.

केवळ मदत नव्हे, तर माणूस म्हणून जगण्याचा अधिकार महत्त्वाचा.!

समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अनेकदा दूर राहिलेल्या तृतीयपंथीयांच्या आयुष्यात सणाचा आनंद पोहोचविणे ही निश्चितच संवेदनशील सामाजिक भूमिका आहे. मात्र, त्यांना केवळ सणासुदीला मदतीचे किट देऊन चालणार नाही, तर आरोग्य, शिक्षण, स्वच्छतागृहे, निवारा, अंत्यसंस्कार आणि सन्मानाने जगण्याच्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणेही तितकेच आवश्यक आहे.

२१ वर्षानंतर भोकरमध्ये जगद्गुरु नरेंद्राचार्य यांच्या सिद्ध पादुकांचे आगमन!

१८ नोव्हेंबरला भव्य दर्शन सोहळा; अध्यात्मासह मानवसेवेच्या ४२ उपक्रमांची विशेष

भोकर तालुका प्रतिनिधी.साईनाथ बंडोड

भोकर : अध्यात्म, मानवसेवा आणि सामाजिक प्रबोधनाचा संदेश देणारे अनंत श्री विभूषित जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी यांच्या सिद्ध पादुकांचा भव्य दर्शन सोहळा बुधवार, दि. १८ नोव्हेंबर २०२६ रोजी भोकर येथे आयोजित करण्यात आला आहे. तब्बल २१ वर्षांनंतर या पवित्र पादुकांचे भोकर तालुक्यात आगमन होत असल्याने भाविकांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला आहे.

भोकर शहरातील हनुमान मंदिर (क्रिकेट मैदान परिसर), किनवट रोड येथे सकाळी ९ वाजल्यापासून सोहळ्याला प्रारंभ होणार आहे. यानिमित्त भव्य शोभायात्रा, पादुका आगमन, गुरुपूजन, आरती, प्रवचन, उपासक दीक्षा आणि दर्शन अशा विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

अध्यात्मासोबत मानवसेवेचे व्यापक कार्य!

जगद्गुरूश्रींच्या प्रेरणेतून रामानंद संप्रदायाच्या वतीने रक्तदान, २५८ हून अधिक मरणोत्तर देहदान व २२७ पेक्षा जास्त अवयवदान करण्यात आले. अपघातग्रस्तांसाठी मोफत रुग्णवाहिका सेवा,आरोग्य, शिक्षण आणि व्यसनमुक्ती अशा एकूण ४२ समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून व्यापक सामाजिक कार्य केले जात आहे.तरी या सोहळ्यात देखील अनेक गरजू महिलांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात येत आहे.

जानेवारी २०२५ मधील रक्तदान महाअभियानातून १ लाख ७१ हजार १५० रक्तपिशव्या शासनाकडे सुपूर्द करण्यात आल्या आहेत. तसेच मागील वर्षी ६, १८, ००९ वृक्षारोपण ही करण्यात आले.५४ रुग्णवाहिका राष्ट्रीय महामार्गांवर सेवेत कार्यरत आहेत. शासनाच्या खांद्याला खांदा लावून सामाजिक उत्तरदायित्व पार पाडणारा रामानंद संप्रदाय मानवसेवा हीच ईश्वरसेवा या विचाराचा जागर करीत आहे.

भाविकांनी सहकुटुंब उपस्थित राहावे!

या भव्य सोहळ्याचे आयोजन रामानंद संप्रदाय तालुका सेवा समिती, भोकर व जिल्हा सेवा समिती, नांदेड यांच्या वतीने



करण्यात येत आहे. भोकर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यातील भाविक, भक्त, शिष्य, साधक, उपासक, हितचिंतक आणि सेवेकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहकुटुंब उपस्थित राहून जगद्गुरूश्रींच्या सिद्ध पादुकांचे दर्शन घ्यावे, असे आवाहन रामानंद संप्रदायाचे भोकर तालुकाध्यक्ष गंगाधर पडवळे यांनी केले आहे.गुरुनिष्ठा, भक्ती, सामाजिक बांधिलकी आणि मानवसेवेचा त्रिवेणी संगम ठरणारा हा सोहळा भोकरच्या आध्यात्मिक व सामाजिक इतिहासात एक अविस्मरणीय पर्व ठरणार आहे.

गोपाष्टमीचे औचित्य साधत आरकेव्हीएसमचा

गोसेवेचा स्तुत्य उपक्रम

दोन गोशाळांना ५,१५,८९२ लाखांची भेट

कर्मचाऱ्यांच्या दिवाळी बोनस निधीतून सामाजिक बांधिलकीचे अनोखे दर्शन.!

धर्माबाद (अशोक पडोळे)

गोपाष्टमीच्या पवित्र पावन पर्वाचे औचित्य साधून राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, धर्माबाद यांच्या वतीने गोसेवेचा एक स्तुत्य आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला.शाळेच्या कर्मचाऱ्यांच्या दिवाळी बोनस निधीतून एकत्रित झालेल्या रु. ५,१५,८९२/- या रकमेतून ५० टक्के रक्कम पंचकमिटी गो-रक्षण संस्था व ५० टक्के रक्कम श्री सिद्धेश्वर गोशाळा यांना समप्रमाणात भेट म्हणून प्रदान करण्यात आली.

राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिराने सामाजिक बांधिलकी जपण्याची आपली परंपरा यंदाही तितक्याच आत्मीयतेने पुढे नेली आहे. मागील वर्षी दिवाळी बोनसच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देऊन त्यांच्या कष्टांप्रती कृतज्ञता व्यक्त



करण्यात आली होती. यंदा गोपाष्टमीच्या निमित्ताने गोशाळांना मदतीचा हात देत संस्थेने सामाजिक संवेदनशीलतेचा आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

या उपक्रमाबद्दल ठघडतच् उइडए शाळेचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सुबोध ओमप्रकाश जी काकाणी यांनी कर्मचाऱ्यांचे कौतुक करताना सांगितले की, आमच्या ठघडतच् परिवारात सर्व कर्मचारी बंधू-भगिनींनी स्वेच्छेने पुढाकार घेऊन सामाजिक बांधिलकीचा जपणारा हा उपक्रम राबविला, याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. त्यांच्या संवेदनशील आणि सेवाभावी वृत्तीचा मला मनापासून आनंद असून, त्यांच्या उदात्त भावनेचा मला सार्थ अभिमान वाटतो. गोसेवेच्या या पवित्र कार्यात सर्व कर्मचाऱ्यांनी दिलेले योगदान निश्चितच कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे.

राज्य लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी- आयुक्त डॉ.किरण जाधव

नागरिकांना सर्व सेवा ऑनलाईन उपलब्ध करुन द्याव्यात.

बीड (प्रतिनिधी)

नागरिकांना पारदर्शकपणे व दिलेल्या विहित कालावधीमध्ये सेवा मिळावी तसेच त्यांच्या हक्काची जाणीव करुन देण्याच्या उद्देशाने हा राज्य लोकसेवा हक्क कायदा लागू करण्यात आला आहे. नागरिकांना सर्व सेवा ऑनलाईन उपलब्ध करुन द्याव्यात. या कायद्याच्या माध्यमातून प्रशासनाने नागरिकांच्या दारात पोहोचून विहित कालमर्यादेत शासकीय विभागांच्या अधिसूचित सेवा मिळविण्यासोबतच, शासनाची प्रतिमा उंचाविण्यासाठी या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. असे आवाहन राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात राज्य लोकसेवा हक्क कायदा अंमलबजावणीबाबतच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना डॉ.किरण जाधव बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अपर जिल्हाधिकारी हरिश धार्मिक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ.किरण जाधव म्हणाले



की, आपले ब्रिदवाक्य जनतेची सेवा हेच आमचे कर्तव्य असले पाहिजे आणि याच भावनेतून महाराष्ट्रातील जनतेला अर्ज केल्यास त्यांना डिजीटल प्रमाणपत्रही तात्काळ मिळायला हवे याच दिशेने प्रशासनाने सकारात्मक दृष्टीकोनातून वाटचाल करायला हवी. नागरिक कार्यालयात आल्यानंतर त्यांना कार्यालय स्वच्छ दिसून त्यांचे मन प्रसन्न व्हावे अशी आसन व्यवस्था तातडीने कार्यालयाने करावी. आपले सरकार केंद्राद्वारे विहीत कालमर्यादेत सेवा पुरविण्यासाठी पावले उचलली गेली पाहिजे. जिल्ह्यातील सर्व आपले सरकार सेवा केंद्रावर तक्रार पेटी ठेवण्यात यावी. आपले सरकार केंद्रामधुन विविध सेवांसाठी अर्ज आणि अपील दोन्ही करता येतात. हा कायदा नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त असून, या कायद्याची माहिती जनतेला व्हावी यासाठी प्रत्येकाने आपल्या कार्यालयाच्या दर्शनी भागात या कायद्याच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सेवांची व त्यासाठीच्या कालमर्यादेची माहिती डकविणे बंधनकारक आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीने प्रशासन अधिक गतिमान आणि पारदर्शक होण्यास मदत होणार आहे. विहित कालमर्यादेत काम न करणाऱ्या अधिकाऱ्यासाठी दंडाची तरतूद या अधिनियमात करण्यात आली असल्याचे ही डॉ.किरण जाधव यांनी यावेळी सांगितले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ अंतर्गत कायद्याची सविस्तर माहिती संगणकीय सादरीकरणाद्वारे उपलब्ध करुन दिली. जिल्ह्यातील प्राप्त अर्ज व प्रलंबित अर्ज, विभागनिहाय व तालुकानिहाय कामगिरी, प्रचार व प्रसार सूचना फलक, अपील अहवाल, अधिसूचित सेवाची विभागनिहाय संख्या, वेळेत निकाली प्रकरणे, ग्रामपंचायत सेवा केंद्रे, आपले सरकार सेवा केंद्रासाठी जाहिरात व अर्जस्थिती, सक्रीय व शुन्य व्यवहार आपले सरकार सेवा केंद्र, आदर्श आपले सरकार सेवा केंद्रे आदिच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावाही आयुक्त डॉ.जाधव यांनी यावेळी घेतला.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या माध्यमातून जिल्ह्यात जास्तीत-जास्त सेवांचा लाभ देण्यासाठी सध्या अधिसूचित असलेल्या सेवांची बीड जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येईल. सर्वांनी मुदतीत सेवा द्यावी. तसेच हा कायदा जास्तीत-जास्त नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व विभागप्रमुखांनी वेळेत कार्यवाही करावी. असेही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बैठकीत निर्देश दिले. यावेळी बैठकीस संबंधित यंत्रणेचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेवराई न्यायालयातील कर्मचाऱ्यांचा आजपासून बेमुदत संप सुरु; कामकाज पूर्णपणे ठप्प,

गेवराई वकील संघाचाही आंदोलनाला जाहीर पाठिंबा

गेवराई (प्रतिनिधी)

गेल्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या वेतनवाढ आणि इतर न्याय्य मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाने (गट क) पुकारलेल्या राज्यव्यापी आंदोलनाच्या हाकेला प्रतिसाद देत, गेवराई येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी आज, मंगळवार (दि. १७ नोव्हेंबर) पासून बेमुदत काम बंद संप सुरू केला आहे. विशेष म्हणजे, कर्मचाऱ्यांच्या या लढ्याला गेवराई वकील संघानेही आपला जाहीर पाठिंबा दर्शवला आहे. या बेमुदत संपामुळे न्यायालयाचे दैनंदिन कामकाज पूर्णपणे ठप्प झाले असून न्यायदान प्रक्रियेवर मोठा परिणाम झाला आहे.

काय आहेत कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्या?

न्यायालयात दाखल होणाऱ्या प्रकरणांची संख्या दिवसेंदिवस वाढत असताना अपुऱ्या मनुष्यबळावर कर्मचाऱ्यांना मोठा ताण सहन करावा लागत आहे. कामाचे स्वरूप आणि जबाबदारी लक्षात घेता कनिष्ठ न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या वेतनात मोठी तफावत आहे. उच्च न्यायालयाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणेच 'समान काम, समान वेतन' या तत्त्वानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, ही या आंदोलनाची मुख्य मागणी आहे. या संदर्भातील वेतनवाढीचा प्रस्ताव गेल्या २२ महिन्यांपासून शासनाकडे प्रलंबित असून त्यावर कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही.



टप्प्याटप्प्याने तीव्र झाले आंदोलन

शासनाचे लक्ष वेधण्यासाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी यापूर्वी लोकशाही मार्गाने अनेक आंदोलने केली. सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून कामकाज केले, तसेच एकदिवसीय सामूहिक रजा आंदोलनही पुकारले होते. मात्र, शासनाने या आंदोलनाची दखल न घेतल्याने आणि प्रस्तावाला मंजुरी न दिल्याने राज्यभरातील सुमारे ३५ हजार न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी नाइलाजास्तव १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाचे हत्यार उपसले आहे.

गेवराई न्यायालय परिसरात घोषणाबाजी व वकील संघाचा पाठिंबा

आज सकाळी न्यायालय सुरू होण्याच्या वेळेत गेवराई दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या प्रवेशद्वाराबाहेर सर्व पुरुष व महिला कर्मचारी मोठ्या संख्येने एकत्र आले. हातात मागण्यांचे फलक घेऊन आणि जोरदार घोषणाबाजी करत कर्मचाऱ्यांनी शासनाच्या उदासीन धोरणाचा निषेध नोंदवला. दरम्यान, न्यायालयीन कर्मचारी हे न्यायव्यवस्थेचा महत्त्वाचा कणा असून त्यांच्या मागण्या पूर्णपणे रास्त आहेत, अशी भूमिका घेत गेवराई वकील संघाने या संपाला आपला सक्रिय पाठिंबा जाहीर केला आहे.

पक्षकारांची गैरसोय आणि कामकाजावरील परिणाम

दिवाळीच्या सुट्टीनंतर न्यायालयीन कामकाज नुकतेच पूर्वपदावर येत असताना हा संप पुकारल्यामुळे ग्रामीण भागातून येणाऱ्या पक्षकारांची मोठी गैरसोय होत आहे. संपामुळे खालील कामकाज पूर्णपणे थांबले आहे. जोपर्यंत राज्य शासन प्रलंबित वेतनवाढीच्या प्रस्तावावर सकारात्मक निर्णय घेऊन शासन निर्णय जारी करत नाही, तोपर्यंत एकही कर्मचारी कामावर रुजू होणार नाही आणि हा बेमुदत संप अधिक तीव्र केला जाईल, असा ठाम निर्धार राज्यासह गेवराईतील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

अंबीका चौकातील किराणा दुकानात घरफोडी करणाऱ्या चोरट्यास शिवाजीनगर पोलिसांकडून अटक

धाराशिव जिल्ह्यातून चोरलेल्या तीन मोटारसायकलींचे गुन्हे देखील उघड

बीड (प्रतिनिधी)

शहरातील अंबीका चौक परिसरातील एका किराणा दुकानाचे शटरचे कुलूप तोडून रोख रक्कम चोरून नेणाऱ्या आरोपीस शिवाजीनगर पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे जेरबंद केले आहे. या तपासादरम्यान आरोपीने आपल्या साथीदारांसह धाराशिव जिल्ह्यातून चोरलेल्या तीन मोटारसायकलींचे गुन्हेही उघडकीस आले आहेत.

फिर्यादी चैतन्य सखाराम हरकुडे (वय २९ वर्षे, रा. शिवराय कॉलनी, पांगरी रोड, बीड) यांचे अंबीका चौक येथे 'ज्ञानेश्वर किराणा स्टोअर्स' नावाचे दुकान आहे. दिनांक १४/११/२०२६ रोजी रात्री १०:०० ते दिनांक १५/११/२०२६ रोजी सकाळी ०८:०० वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने दुकानाच्या लोखंडी शटरचे कुलूप तोडून काऊंटरमधील ५,०००/- रुपये रोख रक्कम चोरून नेली.

सदर गुन्ह्याचा तपास करताना शिवाजीनगर पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजद्वारे चोरट्याचा माग काढला. सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने पडताळणी केल्यानंतर पोलिसांनी ते फुटेज फिर्यादीस दाखवले असता, फिर्यादीने फुटेजमधील संशयित इसमास ओळखले. त्यावरून पोलिसांनी ओम महेश गायकवाड (वय २३ वर्षे, रा. माऊली नगर, अंबीका चौक, पांगरी रोड, बीड) यास निष्पन्न केले.

फिर्यादीच्या तक्रारीवरून दिनांक १६/११/२०२६ रोजी रात्री २१:०० वाजता पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे गुरनं. ३८४/२०२६ (भा.न्या.सं. कलम



३३१(४), ३०५ प्रमाणे) गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपी ओम महेश गायकवाड यास दिनांक १६/११/२०२६ रोजी रात्री २३:५३ वाजता अटक केली. पोलिसांनी आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेली होंडा युनिकॉर्न मोटारसायकल (क्र. चक २५ -त ७५६६, किंमत

अंदाजे १,००,०००/- रुपये) हस्तगत केली. सदर गाडीबाबत सखोल चौकशी केली असता, ती गाडी चोरीची असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीने विचारपूसमध्ये कबुली दिली की, त्याने ही मोटारसायकल धाराशिव येथून चोरली असून, यासोबतच इतरही दोन मोटारसायकली त्याने आपल्या साथीदारांच्या मदतीने धाराशिव येथून चोरून आणल्या आहेत. सदर मोटारसायकल चोरीप्रकरणी धाराशिव येथील आनंदनगर आणि येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. चोरीस गेलेली रोख रक्कम हस्तगत करणे आणि त्याचे इतर साथीदार व चोरीच्या उर्वरित वाहनांबाबत अधिक तपास करण्यासाठी आरोपीस मा. न्यायालयात हजर करून पोलीस कोठडीची मागणी करण्यात आली आहे.सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत साहेब, अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राजीव नवले साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ शिवाजीनगर पोलीस ठाणे तसेच तपास अंमलदार पोह रवी आघाव, पोशि दिलीप राठोड, पोशि शुभम सोनवणे, पोशि अनिल घटमल व पोशि अशोक राडकर यांनी केली आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 (MAHARSHTRA).

पेज नंबर २ वर वाचा..
आजचा विशेष अग्रलेख..
ई-केवायसी आणि आधारच्या अडचणींसाठी शेतकऱ्यांनी हेलपाटे का मारावेत?

दैनिक
समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकारांचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ७ वे अंक - ६९ बुधवार दि. १८ नोव्हेंबर २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-7th Issue- 69 Wednesday, Dt.18 November 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

दुष्काळाच्या संकटात शेतकरी, सर्वसामान्य जनता आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे -आ. विजयसिंह पंडित





गेवराई दि.१७(प्रतिनिधी) दुष्काळ आणि आगामी काळातील संभाव्य भीषण पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि पशुधनासमोर अनेक गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. या कठीण परिस्थितीत प्रशासनाने केवळ कागदोपत्री नियोजन न करता प्रत्यक्ष कृतीतून जनतेला दिलासा देण्यासाठी काम करावे. शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांनी समन्वयाने आणि संवेदनशीलतेने कार्यवाही करावी, असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. दुष्काळ व टंचाई निवारणार्थ करावयाच्या उपाययोजनांचा आढावा बैठकीत ते बोलत होते.

दुष्काळ व टंचाई निवारणार्थ करावयाच्या उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी गेवराई तहसील कार्यालयाच्या वतीने र. भ. अट्टल महाविद्यालयातील गोदावरी सभागृहात माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ. विजयसिंह पंडित, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, उपविभागीय अधिकारी शुभम पवार, तहसीलदार गीतांजली गरड, गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप, कृषी अधिकारी सचिन गिरी आदी अधिकारी, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी आमदार अमरसिंह पंडित म्हणाले की, टंचाई काळात नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी कायमस्वरूपी जलस्त्रोत निर्माण करणे आवश्यक आहे. केवळ टँकरवर अवलंबून न राहता उपलब्ध पाणीपुरवठा योजनांचा प्रभावी वापर करून पर्यायी व्यवस्था उभी करावी. नरेगा अंतर्गत मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी कृती आराखडा तयार करून कामे तातडीने सुरू करावीत. वैयक्तिक लाभाच्या योजना, रेशीम शेती, सिंचन विहिरी आणि जलतारा यासारखी मंजुरीसाठी प्रलंबित असलेली प्रकरणे तातडीने निकाली काढावीत.

जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करणे, चारा पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन देणे, पिकविमा व दुष्काळ अनुदानाचे वाटप, ई-पिक पाहणी आणि फार्मर आयडीसाठी शेतकऱ्यांची कोणतीही अडवणूक होणार नाही, याची दक्षता प्रशासनाने घ्यावी. तसेच गाळमुक्त तलाव, गाळयुक्त शिवार, शेततळे, नाला खोलीकरण व सरळीकरण यासारखी जलसंधारणाची कामे जलगती अभियानांतर्गत प्राधान्याने हाती घ्यावीत. मायक्रो फायनान्स व खासगी फायनान्स कंपन्यांकडून होणारी सक्तीची कर्जवसुली थांबविण्यासाठीही प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी आ. विजयसिंह पंडित यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना टंचाई निवारणासाठी ठोस उपाययोजना राबवा, प्रलंबित कामांना तातडीने मंजुरी देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

गेवराई तालुक्यातील पाणीटंचाईवर तातडीने उपाययोजना करण्यासाठी त्यांनी काही महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या. गेवराई नगर परिषदेची जुनी पाणीपुरवठा योजना, गढी ग्रामपंचायतीची योजना आणि जय भवानी सहकारी साखर कारखान्याची पाइपलाइन यांचे नागझरी परिसरात एकत्रीकरण करून तात्पुरता फिल्टर प्लांट उभारावा. त्याद्वारे दररोज किमान १०० टँकर भरण्याची व्यवस्था करावी. खांडवी, पाडळसिंगी व राजपिंप्री या गावांसाठीच्या पाणीपुरवठा योजनेतून बागपिंपळगाव येथे तात्पुरता फिल्टर प्लांट उभारून दररोज ५० टँकर भरण्याची व्यवस्था करावी. तसेच बंगालीपिंपळा, शेकटा, खळेगाव व कोळगाव पाणीपुरवठा योजनेच्या शृंगारवाडी येथील उपलब्ध सुविधांचा वापर करून आणखी ५० टँकर भरण्याची व्यवस्था करावी, अशा सूचना त्यांनी केल्या.

तलवाडा येथील पाणीपुरवठा योजनेचा शाश्वत जलस्त्रोत निर्माण करण्यासाठी तलाव परिसरात दोन विहिरी बांधण्यास मंजुरी द्यावी. मादळमोही येथील जवाहरवाडी तलावात मोठ्या आकारमानाची विहीर बांधावी अथवा अस्तित्वातील विहिरीचे रुंदीकरण व खोलीकरण करावे, अशी मागणीही त्यांनी केली. आम्ला येथील पाणीपुरवठा योजनेसह इतर योजनांसाठी एक्स्प्रेस फीडर बसविण्याचे काम तातडीने पूर्ण करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

गेवराई विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावातील सरपंच व पदाधिकाऱ्यांनी मांडलेल्या समस्या गांभीर्याने घेऊन त्यांचे प्रशासकीय पातळीवर निराकरण करण्यात यावे. ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी आणि पशुधनाला पाणी, चारा व रोजगाराच्या बाबतीत कोणतीही अडचण निर्माण होणार नाही, यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वयातून कालबद्ध कार्यक्रम राबवावा. दुष्काळाच्या या कठीण काळात प्रशासनाने जनतेच्या पाठीशी उभे राहून काम करणे हीच खरी जबाबदारी आहे, असे आवाहन माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांनी केले.

या बैठकीला विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, सरपंच, ग्रामसेवक आणि गेवराई विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुष्काळाच्या झळांमध्ये पेटणार विचारांची मशाल मोहा येथे तीन दिवशीय राज्यस्तरीय अभ्यास शिबिर

कॉ.डॉ.अशोक ढवळे, कॉ. डॉ. डी. एल. कराड,कॉ.विक्रम सिंह यांची प्रमुख उपस्थिती

परळी / प्रतिनिधी

बीड जिल्ह्याला सध्या भीषण दुष्काळाच्या झळा बसत असून, हाताला काम नसल्याने शेतमजूर आणि कष्टकरी वर्गावर अक्षरशः उपासमारीची वेळ ओढवली आहे. या गंभीर आणि आव्हानात्मक परिस्थितीत निराशेच्या गर्तेत सापडलेल्या श्रमिकांच्या जीवनात वैचारिक क्रांती घडवून आणण्यासाठी व त्यांच्या हक्कांच्या लढ्याला नवे बळ देण्यासाठी परळी तालुक्यातील मोहा येथे दिनांक १८ ते २० नोव्हेंबर दरम्यान राज्यस्तरीय तीन दिवसीय अभ्यास शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

मोहा येथील ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी तथा जिल्ह्याचे माजी खासदार कॉ. गंगाधरअप्पा बुरांडे सांस्कृतिक सभागृहात हे शिबिर संपन्न होणार असून या शिबिरासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून २०० पेक्षा अधिक निवडक प्रतिनिधी दाखल होणार असून, बीड जिल्हा शेतमजूर युनियनच्या वतीने या शिबिराची सर्व तयारी पूर्ण करण्यात आली आहे. राज्यस्तरीय शिबिराचे मुख्य आकर्षण म्हणजे प्रमुख कामगार नेत्यांचे मार्गदर्शन लाभणार आहे ज्यामध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे पॉलिट ब्युरो (सचिव मंडळ) सदस्य कॉ. डॉ. अशोक ढवळे आणि सिटू () संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष कॉ. डॉ. डी. एल. कराड, शेतमजूर युनियनचे अखिल भारतीय सेक्रेटरी कॉम्रेड विक्रम सिंग (हिमाचल प्रदेश) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. त्यांच्यासोबतच राज्यातील इतरही अनेक प्रमुख कामगार व शेतमजूर नेते या तीन दिवसांत प्रतिनिधींशी संवाद साधणार आहेत.

नैसर्गिक आपत्ती आणि सरकारी अनास्थेमुळे ग्रामीण भागातील अर्थचक्र थांबले आहे. रोजगाराच्या शोधात होणारे स्थलांतर, मजुरांची होणारी आर्थिक पिळवणूक आणि वाढती महागाई यामुळे कष्टकरी वर्ग मेटाकुटीला आला आहे. अशा वेळी केवळ तात्पुरत्या मदतीवर अवलंबून न राहता, मूळ प्रश्नांची उकल करणे आणि शेतमजुरांना त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटित करणे ही काळाची गरज बनली आहे. याच उद्देशाने आयोजित केलेले हे शिबिर केवळ एक औपचारिक कार्यक्रम नसून, ते कष्टकऱ्यांच्या जीवनात शाश्वत आणि वैचारिक परिवर्तन घडवून आणणारे एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. क्रांतिकारी चळवळीचा वारसा लाभलेल्या कॉ. गंगाधरअप्पा बुरांडे यांच्या कर्मभूमीत म्हणजेच मोहा येथे होणाऱ्या या शिबिरातून राज्यभरातील शेतमजूर आणि कामगार चळवळीला नवी दिशा देणारे असणार असल्याची माहिती महाराष्ट्राचे शेतमजुरी युनियनचे कॉ.बळीराम भूंबे, कॉ.दत्ता डाके,कॉ. सुदाम शिंदे, कॉ.सय्यद रजाक यांनी दिली.

बाळासाहेबांचा शिवसैनिक ही ओळख माझ्यासाठी आयुष्यभर जपलेला स्वाभिमान- अनिलदादा जगताप

शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन!




बीड, प्रतिनिधी- हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचा शिवसैनिक म्हणून मिळालेली ओळख ही माझ्यासाठी केवळ राजकीय ओळख नसून आयुष्यभर जपलेला स्वाभिमान आहे. बाळासाहेब आज देहाने आपल्यात नसले तरी त्यांच्या विचारांतून, हिंदुत्वाच्या भूमिकेतून आणि प्रत्येक शिवसैनिकाच्या मनात ते आजही जिवंत आहेत. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे आणि सर्वसामान्यांच्या सेवेसाठी कार्यरत राहणे, हेच त्यांना वाहिलेले खरे अभिवादन आहे, अशी भावना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी व्यक्त केली. काल दि. १७ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजताच्या दरम्यान हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त बीड शहरातील शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी अनिलदादा जगताप यांनी सहकारी पदाधिकारी व शिवसैनिकांसमवेत बाळासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन केले. यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना अनिलदादा जगताप म्हणाले की, शिवसैनिकांसाठी आजचा दिवस काळजाला चटका लावणारा आणि वेदनादायी आहे. याच दिवशी बाळासाहेबांनी देहाने आपल्यातून निरोप घेतला. मात्र, आजवर मी त्यांना कधीही स्वर्गवासी म्हटले नाही. कारण बाळासाहेब माझ्यासाठी आजही जिवंत आहेत. माझ्या हृदयात, विचारांत आणि प्रत्येक श्वासात ते आहेत. काळ बदलला, पिढ्या बदलल्या, परिस्थितीही बदलली; मात्र बाळासाहेबांविषयीचे प्रेम, निष्ठा आणि त्यांच्या विचारांवरील श्रद्धा तसूभरही कमी झालेली नाही. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे घेऊन जाणे, हीच आमच्यासारख्या प्रत्येक शिवसैनिकाची खरी बांधिलकी आहे.

मी बाळासाहेबांचा शिवसैनिक आहे, यापेक्षा अभिमानाची दुसरी कोणतीही ओळख माझ्यासाठी असू शकत नाही. ही केवळ ओळख नसून आयुष्यभर जपलेला स्वाभिमान आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, बाळासाहेबांच्या विचारांचा, हिंदुत्वाचा आणि जनसेवेचा वारसा आज महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब समर्थपणे पुढे घेऊन जात आहेत, ही प्रत्येक निष्ठावंत शिवसैनिकासाठी समाधानाची बाब आहे. सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नांसाठी धावून जाण्याची वृत्ती आणि कार्यकर्त्याला सोबत घेऊन पुढे जाण्याची भूमिका यातून बाळासाहेबांच्या विचारांचा वारसा पुढे चालत असल्याची भावना अधिक दृढ होते. एक निष्ठावंत शिवसैनिक म्हणून एकनाथजी शिंदे साहेबांच्या खांद्याला खांदा लावून उभे राहणे, त्यांच्या नेतृत्वाला साथ देणे आणि बाळासाहेबांनी दिलेला विचारांचा वारसा कृतीतून जपणे, हेच माझ्यासाठी बाळासाहेबांना वाहिलेले खरे अभिवादन आहे, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

याप्रसंगी प्रास्ताविक प्रतिक कांबळे यांनी केले. तर जिल्हा संघटक सुनील सुरवसे, तालुकाप्रमुख संतोष जाधव, शेतकरीसेना जिल्हाप्रमुख ॲड. बापूसाहेब जाधव, शिक्षकसेना जिल्हाप्रमुख दत्तात्रय कवचट, विधीसेना जिल्हाप्रमुख ॲड. संतोष घोलप, महिला आघाडी संपर्कप्रमुख ॲड. संगीता चव्हाण आणि महिला आघाडी जिल्हा समन्वयक प्रतिभा गणोरेकर यांनी मनोगत व्यक्त करून बाळासाहेबांच्या स्मृतींना उजाळा दिला व त्यांना अभिवादन केले. यावेळी बीड विधानसभा प्रमुख सुनील भाऊ अनभुले, बीड नगरपालिकेचे सभापती ॲड. संजय उडान, उपजिल्हाप्रमुख अमोल जाधव, बीड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दीपक काळे, तालुका समन्वयक आबासाहेब आगलावे, शहर समन्वयक हनुमानप्रसाद पांडे, जिल्हा सहसंघटक सुनील गवते, शहर सहसंघटक ऋषिकेश जोगदंड, महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख मनोरमा डोईफोडे, महिला आघाडी विधानसभा प्रमुख प्रणिता पवार, तालुकाप्रमुख सुनीता जाधव, तालुकाप्रमुख जया राऊत, शहरप्रमुख मनीषा मोराळे यांच्यासह अंगीकृत संघटनांचे आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रीक्षेत्र कपिलधार मेळाव्याच्या निमंत्रणासाठी प्रा. मनोहर धोंडे यांची मंत्रालयात मंत्र्यांशी भेटीगाठी.!








मुंबई / प्रतिनिधी

श्रीक्षेत्र कपिलधार येथे आयोजित करण्यात येणाऱ्या भव्य मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर मंगळवार, दिनांक १७ नोव्हेंबर २०२६ रोजी मंत्रालय, मुंबई येथे प्रा. मनोहर धोंडे यांनी राज्यातील विविध मंत्री आणि लोकप्रतिनिधींच्या भेटी घेऊन त्यांना मेळाव्याचे निमंत्रण दिले. यावेळी श्रीक्षेत्र कपिलधार मेळाव्याच्या आयोजनासह विविध महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यात आली.

या दौऱ्यात प्रा. मनोहर धोंडे यांनी उपमुख्यमंत्री मा. ना. सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथराव शिंदे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री मा. ना. छगनराव भुजबळ, सार्वजनिक बांधकाम मंत्री मा. ना. शिवेंद्रराजे भोसले, सहकार मंत्री मा. ना. बाबासाहेब पाटील, ओबीसी मंत्री मा. ना. अतुल सावे, मा. ना. पंकज भोयर यांची भेट घेतली.तसेच माजी मंत्री आमदार संजय बनसोडे, माजी मंत्री महादेव जानकर यांच्यासह अन्य मान्यवरांशीही त्यांनी संवाद साधला. याशिवाय वैद्यकीय शिक्षण मंत्री मा. ना. हसन मुश्रीफ यांचीही भेट घेऊन श्रीक्षेत्र कपिलधार मेळाव्याचे निमंत्रण देण्यात आले.

या सर्व भेटींदरम्यान कपिलधार मेळाव्याचे महत्त्व, आयोजन आणि संबंधित विविध बाबींवर चर्चा करण्यात आली. राज्यातील मंत्री व लोकप्रतिनिधींना प्रत्यक्ष भेटून निमंत्रण देण्याच्या माध्यमातून मेळाव्याच्या व्यापक प्रसिद्धीला आणि नियोजनाला चालना मिळणार आहे.

श्रीक्षेत्र कपिलधारच्या मेळाव्याला राज्यभरातून भाविक, अनुयायी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभावी, या उद्देशाने प्रा. मनोहर धोंडे यांनी मंत्रालयात घेतलेल्या या भेटी महत्त्वपूर्ण मानल्या जात आहेत.

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
संपादकीय
बुधवार दि. १८ नोव्हेंबर २०२६
Wednesday, Dt. 18 November 2026
पान -२
PAGE - 2

संपादकीय

अग्रलेख

ई-केवायसी आणि आधारच्या अडचणींसाठी शेतकऱ्यांनी हेलपाटे का मारावेत?

शासनाच्या योजनांचा लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ; डिजिटल सुविधांचा उद्देशच हरवला तर जबाबदार कोण?

शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जातात. शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळावी, शेतीचा खर्च भागविण्यास हातभार लागावा आणि संकटाच्या काळात दिलासा मिळावा, हा या योजनांमागील मुख्य उद्देश असतो. मात्र, प्रत्यक्षात या योजनांचा लाभ मिळवताना शेतकऱ्यांना ज्या अडचणींचा सामना करावा लागतो, ते पाहता शासनाच्या लोककल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. विशेषतः ई-केवायसी, आधार प्रमाणीकरण, बँक खाते लिंकिंग आणि तांत्रिक त्रुटींच्या नावाखाली शेतकऱ्यांना वारंवार कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत असतील, तर ही निश्चितच चिंतेची बाब आहे.

आज शासनाच्या बहुतांश योजना डिजिटल प्रणालीशी जोडल्या गेल्या आहेत. ही काळाची गरज असून पारदर्शकता आणि वेगवान सेवा देण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर स्वागतार्ह आहे. परंतु डिजिटल व्यवस्था निर्माण करताना ग्रामीण भागातील इंटरनेटची उपलब्धता, तांत्रिक साक्षरता, आधारमधील त्रुटी, बँक खात्यांशी संबंधित समस्या आणि सर्व्हरमधील अडथळे यांचा विचार होणेही आवश्यक आहे.

एखाद्या शेतकऱ्याच्या आधार कार्डवरील नावात किरकोळ फरक असेल, बँक खात्याचे प्रमाणीकरण झाले नसेल किंवा ई-केवायसी करताना तांत्रिक अडचण आली, तर त्याला योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागण्याची वेळ येते. ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी कधी बँकेत, कधी आधार केंद्रात, तर कधी कृषी कार्यालयात चकरा माराव्या लागतात. दिवसभर शेतात राबणाऱ्या शेतकऱ्याचा वेळ, पैसा आणि श्रम अशा प्रशासकीय प्रक्रियेत खर्च होतात. दुष्काळ, अवकाळी पाऊस, वाढता उत्पादन खर्च आणि शेतीमालाला मिळणारा अपुरा भाव अशा संकटांनी आधीच त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही अतिरिक्त डोकेदुखी ठरते.

मुळात प्रश्न असा आहे की, शासनाच्या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्याने स्वतःला वारंवार सिद्ध का करावे? शासनाकडे उपलब्ध असलेल्या माहितीची पडताळणी करण्यासाठी शेतकऱ्यालाच हेलपाटे मारायला लावणे कितपत योग्य आहे? तंत्रज्ञानाचा वापर नागरिकांची गैरसोय कमी करण्यासाठी असतो, त्यांना नव्या अडचणींच्या चक्रात अडकवण्यासाठी नव्हे.

यासाठी शासनाने ई-केवायसी आणि आधार प्रमाणीकरणातील त्रुटी दूर करण्यासाठी तालुकास्तरावर विशेष मदत कक्ष सुरू करावेत. ग्रामपंचायत स्तरावर शिबिरे आयोजित करून पात्र शेतकऱ्यांची प्रकरणे तातडीने निकाली काढावीत. तांत्रिक कारणांमुळे लाभ रखडलेल्या शेतकऱ्यांना स्पष्ट माहिती द्यावी आणि प्रत्येक तक्रारीच्या निवारणासाठी कालमर्यादा निश्चित करावी. केवळ ऑनलाइन सूचना देऊन प्रशासनाची जबाबदारी संपत नाही.

शासनाच्या योजना कागदावर लोकाभिमुख आणि प्रत्यक्षात त्रासदायक ठरू नयेत. शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी असलेली यंत्रणा त्यांच्यासाठी अडथळा बनत असेल, तर त्या व्यवस्थेत बदल करण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्याला अनुदानासाठी रांगेत उभे करण्यापेक्षा त्याच्यापर्यंत सुविधा पोहोचविणे हीच खरी लोकाभिमुख प्रशासनाची कसोटी आहे. कारण शेतकरी हा शासनाच्या योजनांचा लाभार्थी असला, तरी तो कोणाच्याही दयेवर जगणारा नाही; तो देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्याच्या सन्मानाची आणि वेळेची किंमत प्रशासनाने ओळखली पाहिजे!

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भारतीय जैन संघटना व शांतिलाल मुथ्था फाउंडेशनच्या पुणे मुख्यालयाला सदिच्छा भेट.!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्राताई पवार यांची उपस्थिती

पुणे / प्रतिनिधी

भारत सरकारचे केंद्रीय गृह व सहकारमंत्री मा. श्री. अमितजी शाह यांनी १६ नोव्हेंबर रोजी भारतीय जैन संघटना (बीजेएस) आणि शांतिलाल मुथ्था फाउंडेशन (एसएमएफ) यांच्या पुणे येथील मुख्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्यासह केंद्र व राज्य सरकारमधील मान्यवर मंत्री, लोकप्रतिनिधी आणि प्रतिष्ठित अतिथी उपस्थित होते.



या विशेष भेटीदरम्यान संस्थेचे संस्थापक शांतिलालजी मुथ्था यांनी भारतीय जैन संघटना आणि शांतिलाल मुथ्था फाउंडेशनच्या चार दशकांहून अधिक काळाच्या राष्ट्रनिर्माणकारी प्रवासाची तसेच सामाजिक क्षेत्रातील योगदानाची सविस्तर माहिती उपस्थित मान्यवरांना दिली.

जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, मूल्यसंस्कार व व्यक्तिमत्त्व विकासाचे कार्यक्रम, आपत्ती व्यवस्थापन आणि सामाजिक विकास अशा विविध क्षेत्रांत संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थेने केलेल्या कार्याचा यावेळी आढावा घेण्यात आला.

यानंतर उपस्थित मान्यवरांशी विविध सामाजिक विषयांवर संवाद साधण्यात आला. तसेच जलनियंत्रण कक्षाला भेट देऊन पाणी व्यवस्थापन, जलस्रोतांचे संवर्धन आणि पाण्याच्या नियोजनासंदर्भात सुरू असलेल्या कार्याची माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी घेतली.या विशेष कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारतीय जैन संघटनेच्या व्यवस्थापकीय संचालिका कोमल जैन यांनी केले. केंद्र आणि महाराष्ट्र शासनातील वरिष्ठ नेतृत्वाची या भेटीला लाभलेली उपस्थिती संस्थेच्या सामाजिक कार्याची दखल घेणारी ठरली. मान्यवरांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन यामुळे सामाजिक परिवर्तन, जलसंवर्धन, आपत्ती व्यवस्थापन आणि राष्ट्रनिर्माणाच्या दिशेने अधिक व्यापक योगदान देण्याचा भारतीय जैन संघटना आणि शांतिलाल मुथ्था फाउंडेशन परिवाराचा संकल्प अधिक दृढ झाला.

बेटमोगरा येथे दिवाळी संध्या स्नेह मेळावा उत्साहात संपन्न, मुख्यत्वे या स्नेह मेळाव्यात बेटमोगरा येथे पूर्वीप्रमाणे भाजीपाला बाजारपेठ सुरू करण्याचा निर्धार

सावली फाउंडेशनच्या कार्याचे अनेक मान्यवरांकडून कौतुक; वृक्ष लागवड व ग्राम स्वच्छतेच्या पहिल्या टप्प्यानंतर, दुसरा टप्पा हा गावात अभ्यासिका निर्माण

मुखेड/ प्रतिनिधी

सावली फाउंडेशन च्या माध्यमातून मागील ३ वर्षांपूर्वी येथील नवयुवकांनी वृक्ष लागवड,वृक्ष संवर्धन करणे या उद्देशाने सुरुवात केली.

तद्नंतर हळूहळू गावातील नवतरुण या मध्ये जुळायला लागली. त्यातच गावांमध्ये काहीतरी बदल घडला पाहिजे, परीवर्तन घडून आले पाहिजे,आणि त्या युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याची जिद्द आणि ओढ निर्माण होवून स्वतः आपले,आपल्या मित्रांचे, पारिवारिक सदस्यांचे वाढदिवस,स्मृतिदिवस अशा कार्यक्रमांवर अवास्तव आणि व्यर्थ खर्च टाळून आपल्या वाढदिवसाच्या निमित्याने एक झाड किंवा जसे जमेल तसे वृक्षारोपण करण्याची सवय त्यांना लागली. पाहता पाहता २ वर्ष लोटून ३ रा वर्ष आला त्यात सावली फाउंडेशन ने बेटमोगरा गावातील श्री.शिवलिंग बादशाह मठ संस्थान परिसरात विविध प्रकारचे झाडे,ह्यात पिंपळ वृक्ष,लिंब,जांभूळ,बेल,वड, उंबर,आंबा,सह विविध प्रकारच्या फुलांची ४०० ते ५०० वृक्षांची लागवड केली,अशा प्रकारे ही चळवळ सुरू होवून सद्यस्थितीत त्याचे रुपांतर ग्रामस्वछता,आरोग्य,शिक्षण, गावात सुसज्ज अशी अभ्यासिका निर्माण अशा बाबींमधून गावकऱ्यांमध्ये परिवर्तनाची नांदी घडवून आणण्यासाठी या ठिकाणी सावली फाउंडेशन ची निर्मिती विविध मर्गदर्शकांच्या मार्गदर्शनातून,गावकऱ्यांच्या सर्वोतपरी मदतीने आणि सहाय्याने ही वाटचाल सुरु असताना प्रत्येक ग्रामस्थांच्या मनात अभिमानाची बाब असून ही अशी चळवळ प्रत्येक गावात रहायलाच पाहिजे कारण सद्यस्थितीत आपल्या राज्याची आणि



देशातील परिस्थिती पाहता प्रत्येकाच्या मनाला वेदना होते की, कुठे जातीवाद, कुठे धर्मवाद,जाती जातीत,धर्मा धर्मात वाद लावणे, जातीयता आणि धर्मांधता अजूनही थांबलेली दिसत नाही.

दलीत आणि बहुजनांवरील अन्याय अत्याचार, महिलांवरील अत्याचार, पोलिसांची दडपशाही, सत्ताधाऱ्यांची हुकूमशाही अशा विविध गोष्टींमुळे ही संतांची भूमी असलेला, महापुरुषांची भूमी संबोधता, शिव, फुले, शाहु, आंबेडकर, आण्णा भाऊ च्या पुरोगामी विचारांचा महाराष्ट्र आज कोणत्या स्थितीत आहे हे तुम्ही आम्ही जाणून आहात. त्यामुळे खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे हे आपण कधी समजणार आहोत. ना हिंदू खतरे में हैं ना, मुसलमान खत रे में हैं, सच कहो तो आज की देश स्थिती में भारत का संविधान खतरे में हैं असेच देशाचे चित्र सद्यस्थितीत इथल्या सत्ताधाऱ्यानी निर्माण केल्याचे आढळून येत आहे.

मुखेड तालुक्यातील राजकिय पटलावरील अतिशय चर्चेचे गाव असलेल्या मौजे बेटमोगरा येथे दि.१० नोव्हेंबर रोजी दिपावलीच्या दिनी येथील सावली फाउंडेशन,धनराज पाटील व श्याम मेनकुदळे यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळी संध्या स्नेह मेळावा ह्या विशेष कार्यक्रमाचे आयोजन श्री.शिवलिंग बादशाह मठ संस्थान बेटमोगरा परिसर येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर तर प्रमुख उपस्थिती म्हणून ह. भ.प.योगेश्वर महाराज हे होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपावली निमित्त दीप प्रज्वलित करण्यात आले. यावेळी सावली फाउंडेशन बेटमोगरा च्या पदाधिकाऱ्यांनी सावली फाउंडेशन ने मागील ३ वर्षांपासून केलेल्या कार्याचा आढावा यामध्ये मुस्तफा पिंजारी (पत्रकार तथा सावली फाउंडेशन सचिव),आकाश कस्तुरे (सावली फाउंडेशन अध्यक्ष),यांनी उपस्थिनासमोर मांडला.

याप्रसंगी हंसराज पाटील, डॉ.फारुख शेख, संदीप पाटील, भानुदास पाटील, पत्रकार भारत सोनकांबळे इत्यादी मान्यवरांनी सावली फाउंडेशन च्या कार्याचे कौतुक करत या चळवळीमध्ये सक्रियपणे सहभागी व्यक्तींचे अभिनंदन करुन पुढील कार्यास मंगल सदिच्छा दिल्या. ह्या वृक्षारोपण, स्वच्छता अभियान या कार्याचे दिवसेंदिवस अधिक गती व लोकसहभाग वाढत राहो असेच जनहिताचे व ग्राम परिवर्तनाचे कार्य अविरत सुरू राहो अशा अनेकांनी सदिच्छा दिल्या.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून योगेश्वर महाराज यांनीही पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन यांसह वृक्षांचे महत्त्व अनन्यसाधारण असुन त्यातून मानवी आरोग्यासाठी वृक्ष लागवड त्यांचे संवर्धन काळाची गरज बनली असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना श्री.सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज यांनीही पर्यावरण संवर्धन आणि संरक्षण यावर मत व्यक्त करत हल्ली मनुष्य जीवन अतिशय धकाधकीचे धावपळीचे झाले असून मनुष्य आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे सांगत, आज काल मनुष्य मोबाईल मध्ये फार गुंतलेला दिसत असल्याचेही ते म्हणाले त्यामुळे चांगल्या आरोग्यासाठी व्यायाम करणे गरजेचे असून त्यांनीही सावली फाउंडेशन च्या कार्याचे मनस्वी कौतुक करुन त्यांना पुढील कार्यास आशीर्वाद व सदिच्छा दिल्या.भोजनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भानुदास नालापल्ले आणि श्याम मेनकुदळे यांनी आभार मानले व अल्पोहारानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.



मुंबई – मंगळवार दिनांक १७ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रा. मनोहर धोंडे यांनी मुंबईच्या शिवाजी पार्क येथील हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख कै. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती स्थळाला भेट देऊन अभिवादन केले.

३५ व्या लग्नवाढदिवशी कोरडे दाम्पत्यांचा सामाजिक बांधिलकीचा अनोखा संकल्प.!

मुख्यमंत्र्यांकडे १ लाख १ हजार रुपयांचा दुष्काळ निधी सुपूर्द, १०० शेतकरी कुटुंबांना किराणा किट वाटपाचाही मानस



मुंबई / प्रतिनिधी : वैयक्तिक आनंदाला सामाजिक बांधिलकीची जोड देत समाजापुढे आदर्श निर्माण करणारे कुलस्वामिनी प्रतिष्ठानचे श्री. विलास कोरडे व सौ. अलका कोरडे या दाम्पत्याने आपल्या ३५ व्या लग्नवाढदिवसाचे औचित्य साधून एक स्तुत्य आणि समाजोपयोगी उपक्रम राबविला आहे. दुष्काळग्रस्त भागातील संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी त्यांनी तब्बल १ लाख १ हजार रुपयांचा दुष्काळ निधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मुंबई येथील मुख्यमंत्री कार्यालयात प्रत्यक्ष भेटून सुपूर्द केला.

कोरडे दाम्पत्याच्या या संवेदनशील सामाजिक उपक्रमाची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या कार्याचे विशेष कौतुक केले. स्वतःच्या वैवाहिक जीवनातील आनंदाचा क्षण समाजातील संकटग्रस्त घटकांच्या मदतीसाठी समर्पित करण्याचा त्यांचा निर्णय निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.यावेळी कोरडे दाम्पत्यासोबत त्यांचे सुपुत्र चि. अविराज कोरडे, लेखक, विचारवंत तथा सामाजिक कार्यकर्ते प्रा. फुलसिंगजी जाधव आणि संजय राठोड यांची विशेष उपस्थिती होती. तसेच राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुलजी सावे आणि मुख्यमंत्री सहायता निधीचे प्रमुख रामेश्वरभाऊ नाईक यांनीही कोरडे परिवाराचे अभिनंदन करून पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

१०० शेतकरी कुटुंबांना किराणा किट देण्याचा संकल्प.! : केवळ दुष्काळ निधी देऊन न थांबता कुलस्वामिनी प्रतिष्ठानच्या माध्यमातून आणखी एक महत्त्वपूर्ण सामाजिक उपक्रम हाती घेण्याचा मानस कोरडे परिवाराने व्यक्त केला आहे. दुष्काळाच्या संकटाचा सामना करणाऱ्या १०० शेतकरी कुटुंबांना किराणा किट देऊन त्यांना मदतीचा हात दिला जाणार आहे. येत्या २१ तारखेला तुळशी विवाहाच्या शुभप्रसंगी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस किंवा अन्य वैयक्तिक आनंदाचे क्षण केवळ उत्सवापुरते मर्यादित न ठेवता त्यातून गरजू आणि संकटग्रस्तांना मदत करण्याची भावना समाजात रुजणे काळाची गरज आहे. कोरडे दाम्पत्याने आपल्या कृतीतून हाच सामाजिक संदेश दिला आहे. त्यांच्या या दातृत्वाचे आणि सामाजिक जाणिवेचे सर्वत्र कौतुक होत असून, त्यांचा हा उपक्रम समाजातील इतरांसाठीही निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

महाराष्ट्र विद्यालय बनसारोळा येथे सन २०१०-२०११ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न



केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील बनसारोळा येथील महाराष्ट्र विद्यालयात सन २०१०-२०११ या शैक्षणिक वर्षातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात संपन्न झाला.अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील जुन्या आठवणींना उजाळा दिला. शाळेतील वर्गखोल्या शिक्षकांचे मार्गदर्शन मित्रांसोबत घालवलेले आनंदाचे क्षण आणि शालेय जीवनातील गमती जमती यांची आठवण काढताना सर्वजण भावूक झाले.या कार्यक्रमाच्या निमित्ताने जुन्या मित्र- मैत्रिणींची पुन्हा भेट झाली.एकमेकांच्या सुख-दुःखांची विचारपूस करत मैत्रीचे नाते अधिक घट्ट करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेप्रती आणि गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

अनेक वर्षांनंतर पुन्हा एकदा शाळेच्या प्रांगणात एकत्र येण्याचा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसून येत होता.जुन्या आठवणी, हास्यविनोद आणि गुरुजनांच्या सहवासाने हा स्नेहमेळावा अविस्मरणीय ठरला. माजी विद्यार्थी याच्या कडून महाराष्ट्र विद्यालय बनसारोळा या शाळेच्या वस्तीगृहातील विद्यार्थासाठी बोअरवेलची सोय करण्यात आली आहे.

या स्नेहमेळाव्यास नरेंद्र काळे साहेब, भागवत दादा गोरे, प्रकाश बोरगावकर सर, तेलंग सर, गरड सर, तानाजी जोगदंड सर, प्रभाकर लांडगे सर, चव्हाण सर, दतात्रय काकडे सर, केशव काकडे सर, रंगनाथ काकडे सर यांच्यासह माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .६४७/२०२६
अनिकेत वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय

ज्याअर्थी अर्जदार नामे **अनिकेत भिमराव मोंढे, रा.सुशी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, सुशी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांच्या स्वत: नामे अनिकेत भिमराव मोंढे यांच्या दि.२२/०१/२००४ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक १७/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २६/११/२०२६

स्वाक्षरीत/- कनिष्ठ लिपीक | शिक्का | आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक.८२७/२०२६
महेश वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड आर.एल.गवारे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **महेश शामराव उदागे, रा.सुशी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, सुशी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांच्या स्वत: नामे महेश शामराव उदागे यांच्या दि.३०/११/२००७ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २१/१२/२०२६

स्वाक्षरीत/- कनिष्ठ लिपीक | शिक्का | आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१०११/२०२६
अविनाश वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड आर.ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **अविनाश पि. भिमराव सुरनर, रा.चोरपुरी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, चोरपुरी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांच्या स्वत: नामे अविनाश पि. भिमराव सुरनर यांच्या दि.१२/०३/२००० रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २१/१२/२०२६

स्वाक्षरीत/- कनिष्ठ लिपीक | शिक्का | आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक.१०७५/२०२६
बेगमबी वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड आर.ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **बेगमबी शब्बीर शेख, रा.रांजणी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, रांजणी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची मुलगी नामे शेख सफीया शब्बीर यांच्या दि.३१/०७/२००० रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १४/१२/२०२६

स्वाक्षरीत/- कनिष्ठ लिपीक | शिक्का | आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक.११६३/२०२६
बाबासाहेब वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड आर.ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **बाबासाहेब पि.मसु पवार, रा.देवकी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, रेवकी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची आई नामे राधाबाई भ्र.मसु पवार यांच्या दि.१३/११/२०२५ रोजीची** मृत्यू नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १८/१२/२०२६

स्वाक्षरीत/- कनिष्ठ लिपीक | शिक्का | आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१०६१/२०२६
सतिश वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड एल.जी.कुलकर्णी)

ज्याअर्थी अर्जदार नामे **सतिश प्रभाकरराव बुरटे, रा.लाडगल्ली गेवराई, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **मुख्याधिकारी, नगर परिषद गेवराई, ता.गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांच्या आई नामे सौ. प्रभावती भ्र. प्रभाकर बुरटे यांच्या दि.२३/०६/२००६ रोजीची** मृत्यु नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- ३०/१२/२०२६

स्वाक्षरीत/- कनिष्ठ लिपीक | शिक्का | आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .८१३/२०२६
नजराना बेगम वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड आर.एल.गवारे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **नजराना बेगम तालेब कुरेशी(वडीलांकडील नाव), नजराना बेगम शफीक कुरेशी(पतीकडील नाव) रा.उमापुर, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, उमापुर, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची स्वत: नामे नजराना बेगम तालेब कुरेशी(वडीलांकडील नाव), नजराना बेगम शफीक कुरेशी(पतीकडील नाव) यांच्या दि.२०/१२/१९८९ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १७/१२/२०२६

स्वाक्षरीत/- कनिष्ठ लिपीक | शिक्का | आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .११०१/२०२६
प्रल्हाद वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय

ज्याअर्थी अर्जदार नामे **प्रल्हाद नारायण साबळे, रा.मुळुकवाडी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, मुळुकवाडी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची आई नामे शहाबाई नारायण साबळे यांच्या दि.२७/०८/२०२४ रोजीची** मृत्यू नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०५/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १६/१२/२०२६

स्वाक्षरीत/- कनिष्ठ लिपीक | शिक्का | आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .११०३/२०२६
रुखमीण वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड आर.ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **रुखमीण भ्र.विठ्ठल गंडे, रा.चोरपुरी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, चोरपुरी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांचा मुलगा नामे रविंद्र पि. विठ्ठल गंडे यांच्या दि.३०/०९/२०१९ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १४/१२/२०२६

स्वाक्षरीत/- कनिष्ठ लिपीक | शिक्का | आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .११६१/२०२६
बाबासाहेब वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड आर.ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **बाबासाहेब पि.मसु पवार, रा.देवकी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, रेवकी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांचे वडील नामे मसु पि बक्षी पवार यांच्या दि.२०/०६/२०१३ रोजीची** मृत्यू नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १८/१२/२०२६

स्वाक्षरीत/- कनिष्ठ लिपीक | शिक्का | आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१०७८/२०२६
शेख यासमीन वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड एस.एस.काळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **शेख यासमीन शेख जुबेर, रा.गेवराई, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **न.प. गेवराई, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची स्वत: नामे शेख यासमीन शेख जुबेर यांच्या दि. २१/१०/१९९२ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०४/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २९/१२/२०२६

स्वाक्षरीत/- कनिष्ठ लिपीक | शिक्का | आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१०७६/२०२६
शकिला वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड एस.एस.काळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **शकीला भ्र. उमेर शेख, रा.गेवराई, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **न.प. गेवराई, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची स्वत: नामे शकीला भ्र. उमेर शेख यांच्या दि. १०/०५/२००० रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०४/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २९/१२/२०२६

स्वाक्षरीत/- कनिष्ठ लिपीक | शिक्का | आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .८४९/२०२६
पोपट वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड एस.एस.ढोबळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **पोपट रामचंद्र बाबरे, रा.रेवकी-देवकी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, रेवकी-देवकी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची १)मुलगी नामे आरती पोपट बाबरे, २) मुलगा नामे गोकुळ पोपट बाबरे यांच्या दि.०९/०४/२००७ व २०/०५/२००८ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २१/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १५/१२/२०२६

स्वाक्षरीत/- कनिष्ठ लिपीक | शिक्का | आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१०३९/२०२६
सिदिनाथ वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड एस.एस.ढोबळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **सिदिनाथ पि.महादेव गवारे, रा.महांडूळा, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, महांडूळा, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांचा मुलगा नामे शंभु पि. सिदिनाथ गवारे यांच्या दि.२२/०८/२०२२ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०४/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १६/१२/२०२६

स्वाक्षरीत/- कनिष्ठ लिपीक | शिक्का | आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१०३७/२०२६
सिदिनाथ वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड एस.एस.ढोबळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **सिदिनाथ पि.महादेव गवारे, रा.महांडूळा, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, महांडूळा, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची मुलगी नामे कार्तीकी पि. सिदिनाथ गवारे यांच्या दि.२८/०७/२०१९ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०४/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १६/१२/२०२६

स्वाक्षरीत/- कनिष्ठ लिपीक | शिक्का | आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१०७२/२०२६
शेख उमेर पि.शेख अब्दुल रहेमान वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड एस.एस.काळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **शेख उमेर पि.शेख अब्दुल रहेमान, रा.गेवराई, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **न.प. गेवराई, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची स्वत: नामे शेख उमेर पि.शेख अब्दुल रहेमान यांच्या दि. ०६/०४/१९८० रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०४/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २९/१२/२०२६

स्वाक्षरीत/- कनिष्ठ लिपीक | शिक्का | आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१०८०/२०२६
शेख नजीर अब्दुल रहेमान वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड एस.एस.काळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **नजीर पि.अब्दुल रहेमान शेख, रा.गेवराई, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **न.प. गेवराई, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची स्वत: नामे नजीर पि.अब्दुल रहेमान शेख यांच्या दि. ०१/०१/१९७३ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुराव

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
विविध वृत्त
बुधवार दि. १८ नोव्हेंबर २०२६
Wednesday, Dt. 18 November 2026
पान –४
PAGE - 4

३७ वी छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धा २०२६ जलतरण स्पर्धेत

बीड जिल्ह्याची जनरल चॅम्पियनशिपवर मोहोर तर ७ सुवर्ण, ६ रौप्य व १ कांस्य पदकांची कमाई








बीड प्रतिनिधी

बीड येथे आयोजित ३७ व्या छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धा २०२६ चा उद्घाटन समारंभ दिनांक १७ नोव्हेंबर २०२६ रोजी बीड पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी सहभागी संघांचे संचलन, मान्यवरांचे मार्गदर्शन, मशाल प्रज्वलन व क्रीडाज्योत प्रज्वलन अशा विविध कार्यक्रमांनी उद्घाटन सोहळ्याची शोभा वाढविली. यानंतर स्पर्धेचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी सर्व सहभागी खेळाडूंना शुभेच्छा देत खिलाडूवृत्तीने स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन केले.

या स्पर्धेमध्ये बीड, जालना, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण व छत्रपती संभाजीनगर शहर अशा एकूण पाच पोलीस घटकांतील खेळाडूंनी सहभाग नोंदविला आहे. आज दिनांक १७ नोव्हेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज जलतरण तलाव, बीड येथे पार पडलेल्या जलतरण स्पर्धेत बीड जिल्ह्याच्या जलतरणपटूंनी उत्कृष्ट कामगिरी करत ७ सुवर्ण, ६ रौप्य व १ कांस्य अशी एकूण १४ पदके मिळविली. यामध्ये पोलीस हवालदार दिलीप गित्ते यांनीही जलतरण क्षेत्रात उल्लेखनीय क्रीडा कामगिरी केली आहे. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर बीड जिल्ह्याने जलतरण प्रकारातील जनरल चॅम्पियनशिप पटकावली असून संपूर्ण बीड पोलीस दलासाठी ही अभिमानास्पद बाब ठरली आहे.

ॲथलेटिक्सच्या वैयक्तिक क्रीडा प्रकारांमध्येही बीडच्या खेळाडूंनी आपली चमक दाखविली. ४ १०० मीटर महिला रिले स्पर्धेत बीड जिल्ह्याच्या महिला संघाने प्रथम क्रमांक मिळविला. उंच उडी महिला गटात बीडच्या उमा इंगळे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला, तर पुरुष गटातील उंच उडी स्पर्धेत बीड जिल्ह्याच्या खेळाडूंनी प्रथम व द्वितीय असे दोन्ही क्रमांक मिळविले. तसेच गोळाफेक महिला गटात बीडच्या सोनाली तांदळे यांनी सुवर्णपदक मिळविले. सांघिक क्रीडा प्रकारांमध्ये महिला बास्केटबॉल स्पर्धेत बीड जिल्ह्याच्या संघाने विजय संपादन केला. दरम्यान, फुटबॉल स्पर्धेत बीड व जालना संघांमध्ये झालेल्या चुरशीच्या सामन्यात जालना संघाने २–१ अशा गोलफरकाने विजय मिळविला. या स्पर्धांमुळे विविध पोलीस घटकांतील अधिकारी व अंमलदार यांना आपले क्रीडाकौशल्य दाखविण्याची संधी मिळत असून त्यांच्यात खिलाडूवृत्ती, शिस्त, संघभावना व परस्पर समन्वय वृद्धिंगत होत आहे. बीड पोलीस दलाच्या वतीने या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात येत असून दिनांक १५ ते २१ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत विविध क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा सुरू राहणार आहेत.

सुधारित वेतनश्रेणी साठी केज न्यायालयातील कर्मचारी बेमुदत संपावर न्यायालयीन कामकाज पूर्णपणे ठप्प; परिसरात कर्मचाऱ्यांचे शिस्तबद्ध ठिय्या आंदोलन

केज/प्रतिनिधी

राज्यातील दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या प्रमुख मागणीसाठी मंगळवार दि.१७ नोव्हेंबर पासून राज्यातील सर्व संवर्गातील न्यायिक कर्मचारी बेमुदत संपावर गेले आहेत.या राज्यव्यापी आंदोलनाचा भाग म्हणून केज येथील न्यायालयाच्या परिसरात कर्मचाऱ्यांनी शांततामय वशिस्तबद्ध पद्धतीने ठिय्या आंदोलन सुरू केले आहे.कर्मचाऱ्यांच्या या संपामुळे न्यायालयाचे दैनंदिन कामकाज पूर्णपणे ठप्प झाले असून,कामानिमित्त आलेल्या पक्षकारांना आणि वकिलांना रिकाम्या हाताने परतावे लागले.मुंबई उच्च न्यायालयाने दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याचा प्रस्ताव ३१ जानेवारी २०२५ रोजी राज्य शासनाकडे पाठवला होता.मात्र, या प्रस्तावाला तब्बल २२ महिने उलटूनही शासन स्तरावर कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. प्रशासनाच्या या उदासीनते विरोधात कर्मचाऱ्यांनी १६ सप्टेंबर २०२६ पासून टप्प्याटप्प्याने आंदोलन सुरू केले होते.अखेर शासन निर्णय घेत नसल्याने आंदोलनाचा अंतिम टप्पा म्हणून दि.१७ नोव्हेंबर पासून राज्यव्यापी बेमुदत संपाचे हत्यार उपसण्यात आले आहे.

चार महासंघांची एकजूट

महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघ (गट–क), महाराष्ट्र स्टेट ज्युडिशियल



स्टेनोग्राफर्स असोसिएशन,महाराष्ट्र राज्य न्यायालयीन बेलिफ कर्मचारी महासंघ आणि महाराष्ट्र राज्य न्यायालयीन गट–ड कर्मचारी महासंघ या चार प्रमुख संघटनांच्या संयुक्त नेतृत्वाखाली हा लढा सुरू आहे.या आंदोलनात कार्यरत कर्मचाऱ्यांसह सेवानिवृत्त न्यायिक कर्मचारीही मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

२१ कलमी आचार संहितेचे काटेकोर पालन

संपादरम्यान न्याय व्यवस्थेचा मानसन्मान राखण्यासाठी चारही महासंघांनी २१ कलमी आचारसंहिता () जारी केली असून, केजमधील आंदोलक कर्मचाऱ्यांकडून तिचे काटेकोर पालन केले जात आहे.

संपाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच १६ नोव्हेंबर रोजी कार्यालयीन वेळ संपल्यानंतर सर्व विभागांच्या चाव्या, शासकीय वाहने, महत्त्वाचे अभिलेख आणि मुद्देमाल सुरक्षित कपाटात ठेवून त्याच्या चाव्या संबंधित पीठासीन अधिकाऱ्यांकडे रीतसर सुपूर्द करण्यात आल्या होत्या.तसेच / – प्रणालीचे वैयक्तिक आयडीही लॉग आऊट करण्यात आले आहेत.मंगळवारी सकाळी १०–३० वाजल्या पासूनच सर्व कर्मचारी जेवणाचा डबा,पिण्याचे पाणी आणि आवश्यक औषधे सोबत घेऊन न्यायालयीन परिसरात ठिय्या देऊन बसले आहेत.न्यायालयाच्या प्रवेशद्वाराला कोणताही अडथळा निर्माण होणार नाही आणि कोणतीही प्रक्षोभक घोषणाबाजी होणार नाही,याची विशेष काळजी घेतली जात आहे.दरम्यान, आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी दररोज सायंकाळी ६–३० वाजता तालुका स्तरावरून अहवाल घेऊन रात्री ८–३० वाजता चारही महासंघांच्या अध्यक्षांची संयुक्त बैठक होणार असल्याची माहिती महासंघाचे अध्यक्ष दिगंबर निकम,राजेंद्र ढवळे,प्रकाश कुलकर्णी,राजाराम मलघे आणि सरचिटणीस विनोद पाथरकर,मनोज नांगरे, सुनिल पटेल,मन्मथ भुरे यांनी दिली आहे.

एडवोकेट राजीव देशमुख यांची बीड जिल्हा परिषद पॅनलवर निवड

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)

बीड जिल्हा तालुका केज मधील वरपगावचे प्रसिद्ध डॉक्टर तात्यासाहेब रंगनाथराव देशमुख यांचे चिरंजीव ⁎एडवोकेट राजीव देशमुख⁎ यांची ⁎बीड जिल्हा परिषदेच्या स्वीकृत विधीज्ञ पॅनलवर⁎ नियुक्ती झाली आहे. बीड जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्हा परिषदेची बाजू औरंगाबाद उच्च न्यायालय खंडपीठात मांडण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

एडवोकेट राजीव देशमुख हे गेली ३० वर्षापासून औरंगाबाद उच्च न्ययालय खंडपीठात एक निष्णात वकील म्हणून काम करत आहेत. ते सध्या जिल्हा परिषद संभाजीनगर, गोदावरी मराठवाडा सिंचन



विकास महामंडळ व म्हाडा चे वकील म्हणूनही औरंगाबाद उच्च न्यायालय खंडपीठात काम पाहत आहेत. तसेच यापूर्वी त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, आरोग्य विद्यापीठ ,नाशिक आणि जिल्हा परिषद, हिंगोलीच्या वतीने वकील म्हणून प्रत्येकी तीन वर्ष उच्च न्यायालय खंडपीठात चांगले काम पाहिले आहे.

त्याचाच परिपाक म्हणून त्यांची बीड जिल्हा परिषदेच्या स्वीकृत विधीज्ञ पॅनलवर नियुक्ती झालेली आहे

त्यांच्या नियुक्ती बद्दल त्यांचे वरपगाव ग्रामस्थांच्या वतीने हार्दिक अभिनंदन. विधी व न्याय क्षेत्रात त्यांचा नावलौकिक आहेच तो आणखी वृद्धिंगत व्हावा हीच या निमित्त सर्वांच्या वतीने हार्दिक शुभेच्छा .

त्यांच्या या नियुक्तीमुळे वरपगावच्या नावलौकिकात भर पडली असून त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अखिल भारतीय पेशवा संघटनेतर्फे एकवीस वा मोफत राज्यस्तरीय वधू वर मेळाव्याचे परभणीत आयोजन

अंबाजोगाई – प्रतिनिधी :–

वैष्णवी मंगल कार्यालय, परभणी येथे अखिल भारतीय पेशवा संघटना तर्फे २९ नोव्हेंबर २०२६ रोजी रविवार मोफत राज्यस्तरीय २१ वा वधू वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे⁎

⁎आतापर्यंत २० मेळावे यशस्वी केल्यानंतर आता अखिल भारतीय पेशवा संघटनेने सर्व शाखीय ब्राह्मणांसाठी दिनांक २९नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० ते २ या वेळेत मोफत राज्यस्तरीय वधू वर परिचय मेळाव्याचे आयोजन वैष्णवी मंगल कार्यालय परभणी येथे केले आहे. मेळाव्यात, प्रमुख पाहुणे ना कॅप्टन श्री आशिष दामले अध्यक्ष परशुराम आर्थिक विकास महामंडळ माजी मंत्री श्री सुरेशराव वरपूडकर आ आमदार श्री राहुल पाटील डॉ श्री राहुल आंबेगावकर चिरायू हॉस्पिटल श्री बाजीराव धर्माधिकारी माजी नगराध्यक्ष परळी वैद्यनाथ उद्घाटक श्री बंडू नाना सराफ..

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री योगेश जोशी सोनपेठकर, प्रमुख अतिथी सचिन वाडे पाटील संस्थापक अध्यक्ष अखिल भारतीय पेशवा संघटना, श्री मोरेश्वर मार्डीकर राष्ट्रीय उपाध्यक्ष अखिल भारतीय पेशवा संघटना, श्री धनंजय नारळे राष्ट्रीय उपाध्यक्ष अखिल भारतीय पेशवा संघटना, श्री योगेश धर्माधिकारी जिल्हाप्रमुख छत्रपती संभाजी नगर, श्री रमेशजी देहेडकर अध्यक्ष ब्राह्मण सभा, श्री अभय जोशी जिल्हा प्रमुख बीड, श्री अनिल डोईफोडे अध्यक्ष ब्राह्मण सहाय्यक संघ नांदेड,जेष्ठ समाज सेवक नंदकुमार पराडकर, विठू गुरु वझुरकर, अभय पटवारी बीड शहर अध्यक्ष, असणार आहे.

⁎मेळाव्यासाठी सर्व शाखिय ब्राह्मण समाजातील प्रथम वधू वर, घटस्फोटीत, विधवा, विधूर, दिव्यांग यांची नावनोंदणी सुरू आहे. नाव नोंदणी प्रत्यक्ष करता येईल. या सर्वांनी नाव नोंदणी करावी, मेळाव्याला सर्वांनी उप वर उप वधू सहित पालकांनी उपस्थीत राहावे असे आवाहन अखिल भारतीय पेशवा संघटनेचे जिल्हा प्रमुख व स्वागत अध्यक्ष श्री दिपक कासांडे, जिल्हा संघटक श्वेता आचार्य, तालुका अध्यक्ष श्री प्रताप कुलकर्णी, शहर अध्यक्ष श्री संजय कुलकर्णी यांनी केले आहे.

⁎आयोजक – वधू वर मेळावा आयोजन समिती अखिल भारतीय पेशवा संघटना

न्यायिक कर्मचाऱ्यांचा प्रलंबित मागण्यासाठी बेमुदत संप ! हक्काच्या मागण्यांसाठी तीव्र आंदोलन !



मानूर प्रतिनिधी

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील दुय्यम न्यायालयातील कर्मचान्यांना उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर ''समान काम समान वेतन'' या तत्वाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणीनुसार आर्थिक लाभ व वेतनवाढ मिळावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्यातील न्यायिक कर्मचाऱ्यांनी तीव्र आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघ (गट–क) तसेच लिपिक, लघुलेखक, बैलिफ व शिपाई या चारही महासंघांनी एकत्रित येऊन शासन दरबारी हा प्रश्न गांभीर्याने घेतला जात नसल्याने आंदोलनाची आणि संपाची हाक दिली आहे. त्या नुसार शिरूर कासार न्यायालयातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी आंदोलन सुरू केले आहे.

मा. उच्च न्यायालयाने जिल्हा न्यायालयातील कर्मचाऱ्यांचा वेतनाचा प्रस्ताव जानेवारी २०२५ मध्ये शासनाकडे मंजुरीसाठी पाठवलेला असुन त्या प्रस्तावावर सर्व महासंघांच्या पदाधिकाऱ्यांनी आणि खुद्द उच्च न्यायालयानेही मोठा पाठपुरावा केला आहे. मात्र, यावर अद्यापही अपेक्षित निर्णय झालेला नसल्याने संपूर्ण महाराष्ट्रातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांमध्ये शासना विरोधात तीव्र असंतोष निर्माण झाल्याने. कर्मचाऱ्यांनी आंदोलनाची भूमिका स्वीकारली आहे.

आंदोलनाची रूपरेषा व टप्पे !: १६ सप्टेंबर २०२६ रोजी एक दिवस काळी फीत लावून शांततेच्या मार्गाने कामकाज केले. तसेच १६ व १७ ऑक्टोबर २०२६ रोजी दोन दिवस काळी फीत लावून शांततेच्या मार्गाने कामकाज केले.

असे असतानाही शासनाने कुठलीही दखल न घेतल्यामुळे महाराष्ट्र राज्यातील सर्व दुय्यम न्यायालयातील ३४००० कर्मचारी दिनांक १७ नोव्हेंबर २०२६ पासून नाईलाजस्तव बेमुदत संपावर गेले असुन शिरूर न्यायालयातील एकुण ११ कर्मचारी संपावर गेल्याने कामकाजावर मोठा परिणाम झाला आहे . शासनाने आमच्या न्याय मागण्या बाबत सकारात्मक विचार करून आम्हाला आमचा हक्क द्यावा जो पर्यंत मागण्या मान्य केल्या जात नाहीत तो पर्यंत संप सुरू रा–हणार असल्याचे मत सहाय्यक अधीक्षक श्रीमती व्ही. जे. जोशी यांनी सांगितले.

या संपामध्ये दिवाणी न्यायालय शिरूर कासार येथील सहाय्यक अधीक्षक श्रीमती व्ही. जे. जोशी , लघुलेखक सागर आजबे, बेलीफ डी.आर.इंगळे, एन.व्ही.काशीद,अनंत जोशी, मेहेरप्रकाश परदेशी, ए.यू.कुलकर्णी,यशराज शेलार, प्रकाश गवळी, सिद्धेश्वर खामकर, सुरेश येवले, अण्णासाहेब तारडे इतर सर्व न्यायालय कर्मचारी सहभागी झाले वकील संघ शिरूर यांनी देखील कर्मचारी यांच्या संपास पाठिंबा दिला आहे.

राज्याचेमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,ना.मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ना.मंत्री पंकजाताई मुंडे, आ.नमिताताई मुंदडा यांचे विजयकांत मुंडेंनी मानले आभार

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील विडा जिल्हा परिषद गटाचे माजी सदस्य विजयकांत विक्रमराव मुंडे यांची राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजने अंतर्गत केज विधान सभा मतदारसंघाच्या सह–अध्यक्ष पदी अधिकृत निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल विजयकांत मुंडे यांनी राज्यातील व जिल्ह्यातील वरिष्ठ नेतृत्वाचे मनःपूर्वक आभार मानले असून, या माध्यमातून मतदार संघातील शेतकऱ्यांचे दळ–णवळणाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूच–नेनुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे आणि माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली,तसेच केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिताताई मुंदडा यांच्या नेतृत्वा खाली ही महत्त्वपूर्ण जबाबदारी विजयकांत मुंडे यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतीमाल बाजारपेठेत नेण्यासाठी आणि शेती कामांसाठी बारमाही



पक्क्या पाणंदरस्त्यांची नितांत गरज असते.ही गरज ओळखून शासनाने मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना सुरू केली आहे.केज मतदार संघातील अतिक्रमित व कच्च्या पाणंद रस्त्यांचे प्रश्न सोडवून या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे महत्त्वपूर्ण काम आता सह–अध्यक्ष म्हणून विजयकांत मुंडे यांच्या माध्यमातून केले जाणार आहे. विजयकांत मुंडे यांच्या या निवडीमुळे केज तालुक्यासह विडा गटातील कार्यकर्त्यां मध्ये उत्साहाचे वातावरण असून, त्यांच्या या नवीन जबाबदारीबद्दल राजकीय,सामाजिक व शेतकरी वर्गातून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

वरिष्ठ नेतृत्वाने माझ्यावर दाखवलेला विश्वास व जबाबदारी प्रामाणीकपणे सार्थ ठरवत केज मतदार संघातील शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत या योजनेचा लाभ पोहोचवून शेत पाणंद रस्त्यांच्या विकासाला गती देण्याचे माझे ध्येय आहे.– विजयकांत मुंडे (सह–अध्यक्ष,मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना,केज विधानसभा तथा माजी जि.प.सदस्य बीड)

दुष्काळात तहानलेल्या गावकऱ्यांच्या मदतीला धावले आनंद काळे.!

वडवणी । प्रतिनिधी

एकीकडे दुष्काळसदृश परिस्थितीमुळे ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत असताना, दुसरीकडे सर्वसामान्य नागरिकांची तहान भागवण्यासाठी सामाजिक बांधिलकी जपत आनंद काळे यांनी मदतीचा हात पुढे केला आहे. उपळी जिल्हा परिषद गटातील इच्छुक उमेदवार आनंद काळे यांनी स्वखर्चातून ट्रॅक्टर व टँकरच्या माध्यमातून ग्रामीण भागात मोफत पाणीवाटप सुरू केले आहे.

ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. अशा परिस्थितीत नागरिकांची पाण्यासाठी होणारी



धावपळ लक्षात घेऊन आनंद काळे यांनी प्रत्यक्ष मदतीसाठी पुढाकार घेतला. केवळ आश्वासने न देता नागरिकांच्या मूलभूत गरजांसाठी प्रत्यक्ष मैदानात उतरून त्यांनी पाणीप–ुरवठ्याचा उपक्रम सुरू केला आहे. राजकारण हे केवळ निवडणुकीपुरते मर्यादित नसून सामान्य माणसाच्या अडचणीच्या काळात त्याच्या पाठीशी उभे राहणे हीच खरी सामाजिक बांधिलकी असल्याचे त्यांच्या या उपक्रमातून दिसून येत आहे. दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या ग्रामीण भागातील नागरिकांना मोफत पाणी उपलब्ध करून देण्याच्या या उपक्रमामुळे आनंद काळे यांचा सामाजिक कार्याचा धडाका पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड – ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 (MAHARSHTRA).

दैनिक
समर्थ राजयोग
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
SAMARTH RAJYOG
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377. मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377. मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ७ वे अंक–६७ मंगळवार , दि. १७ नोव्हेंबर २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-7th Issue- 67 Thusday, Dt.17 Novembar 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

विचार बदला,आयुष्य बदलेल मन:शांतीचा राजयोग

मंत्र बी.के.शिवानी दीदींकडून जालन्यात सहा हजारांहून

अधिक नागरिकांची उपस्थिती माजी मंत्री राजेश भैया टोपे यांच्या पुढाकारातून भव्य आध्यात्मिक सोहळा उत्साहात संपन्न

जालना प्रतिनिधी :- माणसाचे आयुष्य त्याच्या विचारांवर अवलंबून असते. विचार बदलले की भावना बदलतात भावना बदलल्या की वर्तन बदलते आणि वर्तन बदलले की संपूर्ण आयुष्याला नवी दिशा मिळते.त्यामुळे जीवनात सकारात्मक विचारांचा अंगीकार करा स्वत:वर विश्वास ठेवा आणि मनाला शांत ठेवण्यासाठी राजयोग ध्यानाची सवय लावा असा जीवनाला नवी दिशा देणारा मोलाचा संदेश आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या मोटिव्हेशनल स्पीकर व राजयोग शिक्षिका बी.के. शिवानी दीदी यांनी दिला. माजी मंत्री राजेश भैया टोपे यांच्या पुढाकारातून सोमवारी दि.१६ नोव्हेंबर जालन्यात आयोजित भव्य आध्यात्मिक मार्गदर्शन सोहळ्यात त्या बोलत होत्या.या कार्यक्रमाला सहा हजारांहून अधिक नागरिकांनी उस्फूर्त उपस्थिती लावत शिवानी दीदींचे विचार ऐकले.प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय जालना केंद्र आणि माजी मंत्री राजेश भैया टोपे यांच्या संयुक्त विद्यमाने जालना एज्युकेशन सोसायटीच्या आर.जी. बांगडिया कला एस.बी. लाखोटिया वाणिज्य व आर. बेझोनजी विज्ञान महाविद्यालयाच्या जे.ई.एस. कॉलेज प्रांगणात हा भव्य आध्यात्मिक सोहळा पार पडला.परमात्म प्रेम आत्मशक्ती आणि विश्वकल्याणासाठी एक पवित्र भेट या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाने जालन्यात आध्यात्मिक वातावरणाची अनुभूती निर्माण केली.कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. मत्स्योदयी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या बहारदार गणेश वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. आयोजक माजी मंत्री राजेश भैया टोपे यांनी बी.के.शिवानी दीदी यांचे स्वागत केले. स्वागतपर भाषणात त्यांनी मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचा उल्लेख करताना सांगितले की नैसर्गिक संकटांशी झुंज देणाऱ्या नागरिकांना केवळ आर्थिक मदतीचीच नव्हे तर मानसिक आणि आध्यात्मिक बळाचीही गरज आहे.शिवानी दीदी यांच्या मार्गदर्शनातून नागरिकांना संकटांचा सामना करण्यासाठी सकारात्मक ऊर्जा आणि मानसिक शक्ती मिळेल असा



विश्वास त्यांनी व्यक्त केला.यावेळी दिल्ली येथील ब्रह्माकुमारी संस्थेच्या विद्यात्री दीदी यांनी संस्थेच्या कार्याचा वैश्विक परिचय करून दिला.मोबाईलच्या युगात मन:शांतीसाठी राजयोगाची गरज मार्गदर्शन करताना बी.के. शिवानी दीदी यांनी आजच्या धावपळीच्या जीवनशैलीवर भाष्य केले.राग,भीती,चिंता, तणाव आणि नकारात्मक विचार हे मनाच्या शांततेचे सर्वात मोठे शत्रू आहेत.आज माणसाच्या हातात मोबाईल आहे मात्र मनावर स्वत:चे नियंत्रण राहिलेले नाही. त्यामुळे दिवसातील काही मिनिटे स्वत:साठी राखून ठेवत राजयोग ध्यानाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. राजयोगामुळे मन शांत राहते एकाग्रता वाढते आणि योग्य निर्णय घेण्याची क्षमता विकसित होते असे त्यांनी स्पष्ट केले.विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाचा पालकांना संयमाचा मंत्र विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी परीक्षेचा अनावश्यक ताण घेऊ नका,श स्वत:ची तुलना इतरांशी करू नका तर स्वत:च्या क्षमतेवर विश्वास ठेवा असा कानमंत्र दिला.रोज थोडा वेळ का होईना पण मनापासून अभ्यास करा. यशासाठी सातत्य सकारात्मक विचार आणि आत्मविश्वास महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. पालकांनाही त्यांनी महत्त्वाचा संदेश दिला. मुलांवर सतत रागावण्यापेक्षा त्यांना समजून घ्या त्यांच्याशी प्रेमाने संवाद साधा आणि त्यांच्या क्षमतांना वाव द्या. कुटुंबातील नातेसंबंध दृढ ठेवण्यासाठी परस्पर आदर समजूतदारपणा आणि क्षमा करण्याची वृत्ती आवश्यक आहे. आपण दुसऱ्या व्यक्तीला बदलू शकत नसलो तरी स्वत:चे विचार बदलून आपल्या जीवनात सकारात्मक परिवर्तन नक्कीच घडवू शकतो असे त्यांनी सांगितले.राजकीय सामाजिक प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांची मांदियाळी या भव्य सोहळ्याला राजकीय सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. खासदार डॉ. कल्याणराव काळे,माजी विरोधी पक्षनेते अंबादासराव दानवे,आमदार नारायण कुचे, आमदार प्रतापसिंह पाटील, माजी आमदार विलासबापू खरात,कैलासगेठ गोरंट्याल, चंद्रकांत दानवे, अरविंदरावजी चव्हाण, संतोषराव साबरे,महापौर वंदनाताई मगरे,उपमहापौर राजेश राऊत,माजी नगराध्यक्षा संगीताताई गोरंट्याल,भास्करराव दानवे, भास्कर आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रशासकीय व न्यायिक क्षेत्रातून जिल्हा न्यायाधीश भाटिया मॅडम आणि जिल्हाधिकारी आशिमा मित्तल उपस्थित होत्या. उद्योग व सामाजिक क्षेत्रातून घनश्यामशेठ गोयल,समीर अग्रवाल आणि कैलासशेठ लोया यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली. गेल्या अनेक दिवसांपासून या कार्यक्रमाची जय्यत तयारी करण्यात आली होती. विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते,उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, आध्यात्मिक व सत्संग मंडळांचे पदाधिकारी,प्राचार्य, प्राध्यापक,ब्रह्माकुमारीज जालना केंद्राचे पदाधिकारी आणि शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी सामूहिक राजयोग ध्यान करण्यात आले.हजारो नागरिकांनी शांततेच्या वातावरणात ध्यानाचा अनुभव घेतला. विचारांची शुद्धता मनाची शांतता आणि सकारात्मक जीवनशैलीचा संदेश देणारा हा आध्यात्मिक सोहळा जालना शहरासाठी संस्मरणीय ठरला.

व्यसनमुक्त भारताच्या संकल्पनेला बळ द्या

युवा संसद स्पर्धेत सहभागी व्हा

राष्ट्रीय स्तरावर दिल्लीतील संसद भवनात विचार मांडण्याची युवकांना मिळणार संधी

जालना प्रतिनिधी :- युवकांमध्ये व्यसनमुक्तीविषयी जनजागृती निर्माण करण्यासह राष्ट्रनिर्मितीतील त्यांचा सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने मेरा युवा भारत जालना आणि स्व.अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित भारत जिल्हास्तरीय युवा संसद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. नशामुक्त युवा फॉर विकसित भारत या विषयावर आधारित ही भाषण स्पर्धा शुक्रवार२० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता स्व.अंकुशराव टोपे महाविद्यालयात होणार आहे. अमली पदार्थांचे सेवन आणि व्यसनाधीनतेमुळे युवकांच्या शारीरिक,मानसिक व सामाजिक जीवनावर होणारे गंभीर परिणाम लक्षात घेता, या स्पर्धेच्या माध्यमातून व्यसनमुक्त भारताचा संदेश युवकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. तसेच सामाजिक जबाबदारीची जाणीव सकारात्मक विचार आणि राष्ट्रनिर्मितीमधील युवकांचे योगदान यावर सहभागी स्पर्धकांना आपले विचार प्रभावीपणे मांडण्याची संधी मिळणार आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमांतर्गत जिल्हा राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्हा व राज्यस्तरावरील स्पर्धांमधून राष्ट्रीय स्तरासाठी निवड झालेल्या युवकांना थेट दिल्ली येथील संसद भवनात आपले विचार मांडण्याची महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध होणार आहे. जालन्यातील युवकांनी या संधीचा लाभ घेत मोठ्या संख्येने स्पर्धेत सहभागी व्हावे आणि व्यसनमुक्त सक्षम व विकसित भारताच्या निर्मितीसाठी आपला आवाज बुलंद करावा असे आवाहन मेरा युवा भारत जालना यांच्या वतीने करण्यात आले आहे.

भीमराज सेनेच्या जालना जिल्हाध्यक्षपदी

अजिंक्य गडवे राष्ट्रीय अध्यक्ष राजूभाऊ थाटे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान



जालना प्रतिनिधी : भीमराज सेना सामाजिक संघटनेच्या जालना जिल्हाध्यक्षपदी अजिंक्य गडवे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजूभाऊ थाटे यांनी जालना दौऱ्यादरम्यान त्यांच्या नियुक्तीची घोषणा करून अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान केले.राष्ट्रीय अध्यक्ष राजूभाऊ थाटे हे जालना दौऱ्यावर आले असता विश्रामगृह क्रमांक ४८८ येथे हा नियुक्ती सोहळा पार पडला. यावेळी त्यांनी अजिंक्य गडवे यांच्याकडे जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली.समाजातील अन्याय आणि अत्याचाराविरोधात आवाज उठविणे, वंचित व पीडित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे तसेच सामाजिक प्रश्नांवर संघटितपणे काम करणे ही भीमराज सेनेची प्रमुख भूमिका आहे. जालना जिल्ह्यात संघटनेचा विस्तार करून तळागाळातील कार्यकर्त्यांची मजबूत फळी निर्माण करावी पान २ वर....

मंमादेवी परिसरात जलवाहिनीचा व्हॉल्व्ह फुटला

लाखो लिटर पाणी वाया दुरुस्तीअभावी

हजारो लिटर पाण्याची नासाडी प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांमधून संताप

जालना प्रतिनिधी :- शहरातील मंमादेवी परिसरात पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य पाइपलाइनचा व्हॉल्व्ह फुटल्याने मोठ्या प्रमाणावर पाणी रस्त्यावर वाहून जात आहे. या गळतीमुळे लाखो लिटर पाणी वाया जाण्याची शक्यता असून एकीकडे पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले जात असताना दुसरीकडे हजारो लिटर पाणी अक्षरश: वाया जात असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. पाइपलाइनचा व्हॉल्व्ह फुटल्यामुळे सतत पाणी बाहेर पडत असून संबंधित यंत्रणेचे या गंभीर प्रकाराकडे लक्ष नसल्याचे दिसून येत आहे. पाण्याची गळती वेळीच थांबवून दुरुस्ती करणे आवश्यक असताना विलंब होत असल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.एकीकडे नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा करण्यासाठी प्रशासनाला कसरत करावी लागत आहे तर दुसरीकडे अशा प्रकारे मौल्यवान पाण्याची नासाडी होत आहे.त्यामुळे संबंधित पाणीपुरवठा विभागाने तातडीने



घटनास्थळी पाहणी करून फुटलेला व्हॉल्व्ह दुरुस्त करावा आणि पाण्याची गळती थांबवावी अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.पाणी हेच जीवन असताना त्याची अशी उघडपणे होणारी नासाडी रोखणार कोण? असा सवाल आता नागरिक उपस्थित करीत आहेत.

श्री राजराजेश्वर सहस्त्रार्जुन महाराज जयंती

उत्साहात साजरी भक्तिमय वातावरणात

समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती



छायाचित्र : किरण खानापुरे

जालना प्रतिनिधी :- श्री राजराजेश्वर सहस्त्रार्जुन महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. जयंती उत्सवानिमित्त समाजबांधवांनी एकत्र येत महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.या उत्सवाला सो. स. क्षत्रिय समाज, मराठवाडा विभागाचे उपाध्यक्ष संजय पातेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी दत्ता खानापुरे, दत्ता पेंजने, सुनील नाकाडे, विजय पवार, नरेश नाकाडे, मंगेश खानापुरे, श्रीहरी विष्णू, सतीश साधू, आदेश खेरुडकर, पप्पू खेरुडकर यांच्यासह समाजातील महिला मंडळाच्या सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.जयंती उत्सवामुळे परिसरात उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. समाजबांधवांनी एकत्र येत जयंती उत्सव उत्साहात साजरा केला.

पार्श्वभूमी तील वृत्तावरून पत्रकार भरत मानकर यांची पोलिसांत धाव

आपला कोणत्याही तक्रारीशी संबंध नसताना नाव व छायाचित्र प्रसिद्ध केल्याचा आरोप संपादक-प्रकाशकांच्या चौकशीची मागणी

जालना प्रतिनिधी :- दैनिक पार्श्वभूमी च्या १६ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या अंकात प्रसिद्ध झालेल्या वृत्तावरून निर्माण झालेला वाद आता पोलीस प्रशासनाच्या दारात पोहोचला आहे. संबंधित वृत्तात आपले नाव आणि छायाचित्र प्रसिद्ध करून तथ्यहीन तक्रारींशी विनाकारण संबंध जोडण्यात आल्याचा आरोप पत्रकार भरत मानकर यांनी केला आहे. याप्रकरणी त्यांनी जालना जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे लेखी तक्रार दाखल करून दैनिकाचे संपादक,प्रकाशक व संबंधित जबाबदार व्यक्तींची चौकशी करून कायदानुसार कारवाई करण्याची मागणी केली आहे. दैनिक पार्श्वभूमी च्या १६ नोव्हेंबरच्या अंकात गोरंट्याल यांच्याकडून संपविण्याची धमकी व पत्रकार शेळके, मानकर यांना हाताशी धरून तथ्यहीन तक्रारी या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध करण्यात आले होते.या वृत्तात आपले नाव आणि छायाचित्र वापरून पत्रकार दीपक शेळके यांच्यासोबत एका कथित प्रकरणात जोडण्यात आल्याचा आक्षेप मानकर यांनी घेतला आहे.वृत्तपत्राविरोधात तक्रारच नाही मग नाव कशासाठी आपण दैनिक पार्श्वभूमी विरोधात कोणत्याही शासकीय अथवा प्रशासकीय कार्यालयात तक्रार दाखल केलेली नाही.तसेच कोणाच्याही सांगण्यावरून किंवा कोणाच्या हाताशी लागून तक्रारी केल्या नसल्याचे मानकर यांनी स्पष्ट केले आहे.असे असतानाही आपले नाव तथ्यहीन तक्रारींशी जोडून प्रसिद्ध करण्यात आल्याने आपली सामाजिक व व्यावसायिक प्रतिमा मलिन झाल्याचा दावा त्यांनी केला आहे.बाजू न जाणून वृत्त प्रसिद्ध केल्याचा आरोपसंबंधित वृत्त प्रसिद्ध करण्यापूर्वी आपली बाजू जाणून घेण्यात आली नाही तसेच वृत्तातील उल्लेखांची वस्तुस्थिती तपासण्यात आली नसल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. पत्रकारितेचे स्वातंत्र्य मान्य असले तरी कोणत्याही व्यक्तीचे नाव आणि छायाचित्र प्रसिद्ध करताना संबंधित माहितीची सत्यता तपासणे आवश्यक असल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे.आपल्या नावाचा उल्लेख करण्यामागील उद्देश काय होता आणि त्यासाठी कोणते पुरावे वापरण्यात आले याची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे.सात मुद्द्यांवर चौकशीची मागणी पोलीस अधीक्षकांकडे दिलेल्या तक्रारीत मानकर यांनी सात प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. १६ नोव्हेंबरच्या वृत्ताची सखोल चौकशी करावी संपादक व प्रकाशकांकडून खुलासा मागवावा वृत्त प्रसिद्ध करण्यापूर्वी आपली बाजू जाणून घेतली होती का याची पडताळणी करावी नाव व छायाचित्र प्रसिद्ध करण्यामागील उद्देश तपासावा संबंधित पुरावे तपासावेत बदनामीसंदर्भातील कायदेशीर बाबींची पडताळणी करावी आणि भारतीय न्याय संहिता तसेच इतर लागू कायद्यांनुसार गुन्हा निष्पन्न झाल्यास संबंधितांवर कारवाई पान २ वर....

पीयूसी प्रमाणपत्र तपासणी महागणार वाहन

धारकांच्या खिशाला कात्री

दुचाकीपासून डिझेल वाहनांपर्यंत तपासणी शुल्कात वाढ सुधारित दर लागू करण्याच्या सूचना

जालना प्रतिनिधी :- वाहनांमधून होणाऱ्या वायुप्रदूषणाला आळा घालण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र अर्थात पीयूसीच्या तपासणी शुल्कात वाढ करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन आयुक्त कार्यालयाच्या परिपत्रकानुसार सुधारित दर लागू करण्याबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालयाला सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता वाहनधारकांना पीयूसी प्रमाणपत्रासाठी पूर्वीपेक्षा अधिक शुल्क मोजावे लागणार आहे.सुधारित दरानुसार दुचाकी वाहनांच्या पीयूसी तपासणीसाठी ६० रुपये पेट्रोलवरील तीनचाकी वाहनांसाठी १२० रुपये पेट्रोल,सीएनजी,एलपीजी व संबंधित इतर वाहनांसाठी १५० रुपये तर डिझेल वाहनांसाठी १८० रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे. वायूर्ली हेच शुल्क अनुक्रमे ५०, १००, १२५ आणि १५० रुपये होते. वाढत्या वायुप्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर वाहनांची नियमित प्रदूषण तपासणी करणे आवश्यक आहे.पीयूसी प्रमाणपत्र हे केवळ नियमपूर्तीसाठी नसून पर्यावरणाचे संरक्षण आणि हवेची गुणवत्ता राखण्यासाठीही महत्त्वाचे आहे. त्यामुळे वाहनधारकांनी आपल्या वाहनांची वेळोवेळी तपासणी करून वैध पीयूसी प्रमाणपत्र जवळ ठेवावे असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी जालना यांनी केले आहे. दरम्यान वाहनधारकांनी सुधारित शुल्काची माहिती घेऊन अधिकृत पीयूसी केंद्रांवरच वाहनांची तपासणी करून घ्यावी असेही परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे.

..संपादकीय.....

दुष्काळाच्या सावटाखाली ग्रामीण जीवन! पाण्याचा थेंब अनब जगण्याचा संघर्ष; ग्रामीण भागाकडे सरकारचे लक्ष कधी जाणार

दुष्काळ हा केवळ पावसाने पाठ फिरविल्याचा परिणाम नाही तर तो ग्रामीण जीवनाला उद्धवस्त करणारा एक गंभीर सामाजिक आणि आर्थिक प्रश्न आहे.आभाळाकडे डोळे लावून बसलेला शेतकरी पाण्यासाठी मैलोनमैल भटकणाऱ्या महिला चाऱ्याच्या शोधात भटकणारी जनावरे आणि रोजगाराच्या शोधात गाव सोडणारे तरुण... हे चित्र आज ग्रामीण महाराष्ट्राच्या विदारक वास्तवाची जाणीव करून देते.एकीकडे विकासाच्या मोठमोठ्या घोषणा केल्या जातात कोट्यवधींच्या योजनांचा गाजावाजा होतो मात्र दुसरीकडे ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना संघर्ष करावा लागतो.विहिरींची पाणीपातळी खालावते बोअरवेल कोरड्या पडतात तलाव आणि बंधारे तळ गाठतात.अशा परिस्थितीत ग्रामीण जनतेने जगायचे तरी कसे हा प्रश्न निर्माण झाला आहे.दुष्काळाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसतो. पेरणीसाठी घेतलेले कर्ज बियाणे,खते,औषधांचा खर्च आणि त्यानंतर पावसाने दिलेली हुलकावणी यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडतो.पिके वाळतात फळबागा जळतात आणि वर्षभर केलेल्या मेहनतीवर पाणी फिरते.विशेषत मोसंबी, डाळिंब यांसारख्या फळबागा जगविण्यासाठी शेतकऱ्यांना टँकरने पाणी विकत घेण्याची वेळ येते. शेतीचे उत्पन्न तर दूरच पण बागा वाचविण्यासाठीही मोठा खर्च करावा लागतो.अशा वेळी कर्जाचा डोंगर आणि कुटुंबाचा उदरनिर्वाहाची चिंता शेतकऱ्याला मानसिकदृष्ट्याही खचवते.दुष्काळ म्हणजे केवळ शेतकऱ्यांचे संकट नाही. त्याचा परिणाम संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होतो. शेतमजुरांना काम मिळत नाही लहान व्यावसायिकांचा व्यवसाय मंदावतो जनावरांसाठी चारा उपलब्ध होत नाही आणि रोजगारासाठी तरुणांना शहरांकडे स्थलांतर करावे लागते.गावातील बाजारपेठा ओस पडतात.ग्रामीण भागातील अर्थचक्रच थांबण्याची वेळ येते. सरकारकडून टँकर, चारा छावण्या,रोजगार हमी योजना आणि विविध आर्थिक मदतीच्या घोषणा केल्या जातात.मात्र या उपाययोजना केवळ तात्पुरत्या ठरू नयेत. दुष्काळ जाहीर झाल्यानंतर मदत करण्यापेक्षा दुष्काळाची तीव्रता कमी करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करणे ही काळाची गरज आहे. जलसंधारण,शेततळी,नाला खोलीकरण,बंधारे,पाझर तलाव,वृक्षलागवड आणि पावसाचे पाणी अडविण्याच्या कामांना प्राधान्य दिले पाहिजे. विशेषत ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांची नियमित देखभाल बंद पडलेल्या विहिरींचे पुनर्भरण, जलस्रोतांचे संवर्धन आणि उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन झाले पाहिजे. रोजगार हमीची कामे वेळेवर सुरू करून मजुरांच्या हाताला काम आणि कुटुंबाला आधार मिळाला पाहिजे. शेतकऱ्यांना पीकविमा नुकसानभरपाई आणि आर्थिक मदत कोणत्याही विलंबाशिवाय मिळाली पाहिजे. यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे दुष्काळी भागातील लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने केवळ पाहणी दौरे व आश्वासनांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृती करणे आवश्यक आहे.कोणत्या गावात पाण्याची टंचाई आहे कुठे टँकरची गरज आहे कुठे चारा उपलब्ध नाही आणि कुठे रोजगाराची आवश्यकता आहे याचा वस्तुनिष्ठ आढावा घेतला पाहिजे.आज प्रश्न केवळ पावसाचा नाही तर नियोजनाचा आहे.निसर्गाच्या लहरीपणावर नियंत्रण ठेवता येणार नाही मात्र उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन निश्चितच करता येऊ शकते. प्रत्येक गावाने जलसाक्षर होणे पाणी अडविणे आणि पाणी जिरविणे ही लोकचळवळ बनली पाहिजे.ग्रामीण भाग हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. मात्र हाच कणा दुष्काळाच्या झळांनी कमकुवत होत असेल तर विकासाच्या दाव्यांना अर्थ उरत नाही.शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसायचे असतील गावागावातील स्थलांतर थांबवायचे असेल आणि ग्रामीण जीवन पुन्हा समृद्ध करायचे असेल तर सरकारने दुष्काळाकडे केवळ नैसर्गिक आपत्ती म्हणून न पाहता ग्रामीण अस्तित्वाचा प्रश्न म्हणून पाहिले पाहिजे.कारण शेवटी एकच प्रश्न उरतो...गावात पाणी नाही शेतात पीक नाही हाताला काम नाही आणि जनावरांना चारा नाही... मग ग्रामीण माणसाने जगायचे तरी कसेदुष्काळावर मात करण्यासाठी केवळ घोषणा नकोत तर ठोस कृती हवी.अन्यथा पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी ग्रामीण जनतेचा संघर्ष असाच सुरू राहील!

कवडगावच्या रेशन दुकानातील कारभार

संशयाच्या भोवऱ्यात गरीबांच्या हक्काच्या धान्याला कात्री

प्रत्यक्ष साठा ई-पॉस्मशीन आणि वितरण नोंदी तपासण्याची मागणी अनियमितता सिद्ध झाल्यास परवाना निलंबित करा -भानुदास निकम यांचा तहसील प्रशासनाला निवेदन

अंबड प्रतिनिधी :- गोरगरीबांच्या ताटातील अन्नधान्यालाच कुणी हात घालत असेल तर ही बाब गंभीर आहे. शासनाकडून पात्र शिधापत्रिकाधारकांसाठी उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या मोफत व सवलतीच्या रेशन धान्याच्या वितरणात अनियमितता होत असल्याचा आरोप अंबड तालुक्यातील कवडगाव येथील स्वस्त धान्य दुकानाबाबत करण्यात आला आहे. लाभार्थ्यांना शासनाने निर्धारित केलेल्या प्रमाणापेक्षा कमी धान्य मिळत असल्याची तक्रार पुढे आल्याने संबंधित दुकानाचा कारभार आता संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे.या प्रकरणात केवळ कागदोपत्री चौकशी करून प्रकरणावर पडदा टाकू नये तर पुरवठा विभागाने थेट दुकानात जाऊन धान्यसाठा ई-पॉस्मशीनमधील व्यवहार आणि वितरण नोंदींची प्रत्यक्ष तपासणी करावी अशी आक्रमक मागणी अर्जदार भानुदास सखाराम निकम यांनी तहसीलदार तथा तालुका पुरवठा अधिकारी अंबड यांच्याकडे केली आहे. ई-पॉसवरून वितरण लाभार्थ्यांच्या हातात मात्र कमी धान्य रेशनचे धान्य हा गरीब लाभार्थ्यांचा हक्क आहे.मात्र कवडगाव येथील संबंधित दुकानातून निर्धारित प्रमाणापेक्षा कमी धान्य मिळत असल्याच्या तक्रारीमुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शासकीय नोंदीत पूर्ण धान्य वितरण झाल्याचे दाखवले जाते आणि प्रत्यक्षात लाभार्थ्यांना कमी धान्य मिळते का ई-पॉस मशीनवरील व्यवहार आणि प्रत्यक्ष वितरण यात तफावत आहे का? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने तपासणीतून स्पष्ट करावीत अशी मागणी होत आहे.दुकानात प्रत्यक्ष धडक द्या नोंदींची कसून तपासणी करा संबंधित दुकानदाराचा खुलासा मागवून चौकशी पूर्ण झाल्याचे दाखवणे पुरेसे ठरणार नाही.दुकानातील प्रत्यक्ष धान्यसाठा आणि शासकीय अभिलेखांतील साठा यांची पडताळणी करावी.आवक-जावकोंदवही वितरण रजिस्टर ई-पॉस मशीनमधील व्यवहार पावत्या आणि लाभार्थ्यांच्या अंगठ्यांच्या ठशांच्या नोंदी तपासण्यात. त्याचबरोबर लाभार्थ्यांना प्रत्यक्ष किती धान्य मिळाले याचीही खातरजमा करावी अशी मागणी निकम यांनी केली आहे.दुकानदाराचा खुलासा नव्हे लाभार्थ्यांचे जबाब महत्त्वाचे चौकशी करताना केवळ दुकानदाराचे म्हणणे ग्राह्य न धरता संबंधित लाभार्थ्यांचे स्वतंत्र जबाब नोंदविणे आवश्यक आहे. शासनाच्या नोंदीत किती धान्य वितरित झाल्याचे दाखवले आहे आणि लाभार्थ्यांना प्रत्यक्ष किती धान्य मिळाले याची तुलना केल्यास वस्तुस्थिती समोर येऊ शकते. त्यामुळे पुरवठा विभागाने निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी करावी अशी मागणी करण्यात आली आहे.अनियमितता सिद्ध झाल्यास परवाना निलंबित करा चौकशीत धान्याची अफरातफर कमी धान्य वितरण किंवा अन्य नियमभंग सिद्ध झाल्यास संबंधित दुकानदारावर केवळ नोटीस बजावून थांबू नये. लागू कायदे व शासनाच्या नियमांनुसार कठोर कारवाई करून रास्त भाव दुकानाचा परवाना निलंबित अथवा रद्द करण्याची प्रक्रिया राबवावी अशी ठाम भूमिका भानुदास सखाराम निकम यांनी मांडली आहे.आता पुरवठा विभागाच्या कारवाईकडे ग्रामस्थांचे लक्ष कवडगाव येथील या तक्रारीनंतर तहसील प्रशासन काय भूमिका घेते याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. गरीबांच्या हक्काच्या धान्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर प्रशासन प्रत्यक्ष तपासणी करून सत्य समोर आणणार की केवळ कागदोपत्री चौकशीवर समाधान मानणार, हा खरा प्रश्न आहे. रेशन व्यवस्थेतील पारदर्शकता टिकवायची असेल तर तक्रारीची निष्पक्ष चौकशी आणि दोषींवर नियमानुसार कारवाई होणे गरजेचे आहे. कारण हा प्रश्न केवळ एका रेशन दुकानापुरता मर्यादित नसून गोरगरीबांच्या अन्नाच्या हक्काचा आणि शासनाच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील विश्वासाचा आहे.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृह

प्रवेशाची संधी २५ नोव्हेंबरपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन आधार व

स्वयम योजनेंतर्गतही मिळणार लाभ

जालना प्रतिनिधी :- दि. १६ राज्यातील इतर मागासवर्ग विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७मध्ये शासकीय वसतिगृह प्रवेशासह विविध शैक्षणिक योजनांचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयम योजना आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेंतर्गत नियमित व विद्यमान विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी २५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. शासनाकडून प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक प्राप्त झाले असून, जालना जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अथवा ऑफलाइन पद्धतीने अर्ज सादर करावेत असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी केवळ जालना जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणारे ओबीसी, व्हीजेएनटी, ईडब्ल्यूएस आणि एसबीसी प्रवर्गातील नियमित व विद्यमान विद्यार्थी अर्ज करू शकतात. मुलांच्या शासकीय वसतिगृहासाठी निरामय हॉस्पिटल, निसर्ग गार्डनजवळ जुना जालना तर मुलींच्या शासकीय वसतिगृहासाठी वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळाची इमारत छत्रपती कॉलनी जुना जालना येथे अर्जाची प्रत जमा करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.दरम्यान जालना तालुका वगळता जिल्ह्यातील इतर तालुक्यांतील पात्र विद्यार्थ्यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयम योजनेंतर्गत एनटी-सीएवर्गासाठी तर ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेंतर्गत ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी प्रवर्गासाठी अर्ज सादर करावेत.या योजनांचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नियमित व विद्यमान विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अथवा ऑफलाइन पद्धतीने इतर मागास बहुजन कल्याण विभाग जालना कार्यालयात अर्ज सादर करावेत. पात्र विद्यार्थ्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता तातडीने अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी असे आवाहन सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण जालना यांनी केले आहे.

आठ दिवसांत बिनशर्त माफी मागा

अन्यथा कायदेशीर कारवाई माजी आमदार कैलास गोरंट्याल

यांचा दैनिक पार्श्वभूमी चे संपादक दिलीप राठी यांना इशारा

जालना प्रतिनिधी :- चुकीच्या आणि नियमबाह्य कामांवर पांघरूण घालण्यासाठी दैनिक पार्श्वभूमी चे संपादक दिलीप राठी यांनी आपल्यावर बिनबुडाचे आरोप करून राजकीय व सामाजिक प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला आहे.त्यामुळे त्यांनी येत्या आठ दिवसांत बिनशर्त माफी मागावी अन्यथा त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल असा स्पष्ट इशारा माजी आमदार तथा भाजप नेते कैलास गोरंट्याल यांनी दिला आहे.वासंतदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात गोरंट्याल यांनी दैनिक पार्श्वभूमी च्या शासनमान्यता आणि जाहिरातींच्या प्रश्नावर गंभीर आरोप केले आहेत.त्यांच्या म्हणण्यानुसार तत्कालीन अधिकाऱ्यांना हाताशी धरून चुकीच्या व नियमबाह्य पद्धतीने दैनिकाला शासनमान्य यादीत स्थान मिळवून देण्यात आले.तसेच स्वतंत्र आरएनआय क्रमांक नसताना आणि खपाबाबत चुकीची माहिती सादर करून शासन व संबंधित अधिकाऱ्यांची दिशाभूल करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.या प्रकरणी जालन्यातील काही पत्रकारांनी राज्य शासन माहिती संचालक उपसंचालक तसेच जिल्हा माहिती कार्यालयाकडे तक्रारी केल्या आहेत.पत्रकारांना न्याय मिळावा यासाठी आपणही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे स्वतंत्र तक्रार दाखल केल्याचे गोरंट्याल यांनी स्पष्ट केले. दैनिकाच्या कथित गैरकारभाराची प्रशासकीय स्तरावर चौकशी सुरू असल्याने संबंधित संपादक अस्वस्थ झाले असून त्यातूनच आपल्याविरोधात आरोप करण्यात आल्याचा दावा गोरंट्याल यांनी केला. सोमवार १६ नोव्हेंबर रोजी दैनिकात प्रसिद्ध झालेल्या



बातमीत दिलीप राठी यांनी स्वत:च्या शारीरिक व मानसिक स्थितीचा उल्लेख केल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले.दरम्यान राठी यांच्या परिवाराशी आपले अनेक वर्षांपासून कौटुंबिक संबंध आहेत.त्यांच्याशी कोणतेही वैयक्तिक वैर नसताना विरोधकांच्या सांगण्यावरून आपल्याविरोधात आरोप करून प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोपही गोरंट्याल यांनी केला आहे.आठ दिवसांची मुदत पुढील निर्णय काय आपल्यावरील आरोपांबाबत दिलीप राठी यांनी आठ दिवसांच्या आत बिनशर्त माफी मागावी.अन्यथा कायदेशीर मार्गाचा अवलंब करून पुढील कारवाई केली जाईल असा ठाम इशारा कैलास गोरंट्याल यांनी दिला आहे.त्यांच्या या भूमिकेमुळे जालना जिल्ह्यातील राजकीय आणि पत्रकारिता क्षेत्रात या प्रकराची चर्चा रंगण्याची शक्यता आहे.

निवृत्तीवेतनधारकांसाठी जालन्यात विशेष शिबिर जीवनप्रमाण

ॲपद्वारे हयातीचे दाखले ऑनलाइन सादर करता येणार

जालना प्रतिनिधी :- **१७ ते २७ नोव्हेंबरदरम्यान जिल्हा कोषागार कार्यालयात सुविधा डिसेंबरचे निवृत्तीवेतन मिळण्यासाठी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक**

जिल्ह्यातील निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांसाठी डिजिटल हयात प्रमाणपत्र सादर करण्याची प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी जिल्हा कोषागार कार्यालयाच्या वतीने विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. १७ ते २७ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत जिल्हा कोषागार कार्यालय जालना येथे हे शिबिर पार पडणार आहे. या शिबिरात जीवनप्रमाण ॲपच्या माध्यमातून निवृत्तीवेतनधारकांचे ऑनलाइन हयात प्रमाणपत्र डिजिटल लाईफ सर्टिफिकेट तयार करून देण्यात येणार आहे. त्यामुळे निवृत्तीवेतनधारकांना हयातीचा दाखला सादर करण्यासाठी होणारी धावपळ कमी होणार असून ही प्रक्रिया अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.शिबिराचा लाभ घेण्यासाठी निवृत्तीवेतनधारकांनी आधार कार्ड,पीपीओ क्रमांक,बँक खाते पुस्तिका आणि मोबाईल क्रमांक सोबत आणणे आवश्यक आहे. शिबिरस्थळी ऑनलाइन हयात प्रमाणपत्र तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करून देण्यात येणार आहे.दरम्यान ऑनलाइन हयात प्रमाणपत्र सादर झाल्यानंतरच संबंधित निवृत्तीवेतनधारकांना डिसेंबर २०२६ चे निवृत्तीवेतन अदा करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे ज्या निवृत्तीवेतनधारकांनी १ नोव्हेंबरनंतर बँक शाखेत हयात प्रमाणपत्रावर सही केली आहे त्यांनाही ऑनलाइन हयात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.त्यामुळे निवृत्तीवेतन सुरू राहण्याच्या दृष्टीने कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी जिल्हाातील सर्व निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी निर्धारित कालावधीत जिल्हा कोषागार कार्यालयात उपस्थित राहून या विशेष शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी राजू डोके यांनी केले आहे.

पान १ वरून....

भीमराज सेनेच्या जालना जिल्हाध्यक्षपदी

असे निर्देशही राष्ट्रीय अध्यक्षांनी नवनियुक्त जिल्हाध्यक्षांना दिले. अजिंक्य गडवे यांच्या नियुक्तीमुळे जालना जिल्ह्यात भीमराज सेनेच्या संघटनात्मक कार्याला अधिक गती मिळेल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.त्यांच्या निवडीचे विविध स्तरांतून स्वागत होत असून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

पार्श्वभूमी तील वृत्तावरून पत्रकार भरत मानकर यांची

करावी अशा मागण्या त्यांनी केल्या आहेत.या तक्रारीची पत दक्षीम जालना पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांनाही देण्यात आली असून तक्रारीसोबत संबंधित वृत्तपत्राच्या अंकाची प्रत जोडण्यात आली आहे. प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून केलेल्या कार्यवाहीची माहिती लेखी स्वरूपात द्यावी अशी विनंतीही करण्यात आली आहे.एकाच वृत्तावरून तक्रारींची मालिका दरम्यान याच वृत्तच्या अनुषंगाने पत्रकार दीपक शेळके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन देऊन चौकशीची मागणी केली आहे. तसेच भरत मानकर यांनी दैनिकाच्या संपादक व प्रकाशकांना स्वतंत्र निवेदन देत आरोपांचे पुरावे आणि मूळ वृत्ताइतकीच ठळक प्रसिद्धी देण्याची मागणी केली आहे. त्यानंतर आता पोलीस अधीक्षकांकडेही तक्रार दाखल झाल्याने या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.दरम्यान या तक्रारीवर पोलीस प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे याबाबत अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे या प्रकरणाची पोलीस प्रशासनाकडून कशी दखल घेतली जाते आणि संबंधित वृत्तपत्राच्या संपादक व प्रकाशकांकडून काय भूमिका मांडली जाते याकडे जालना जिल्ह्यातील पत्रकारिता क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

वनारशी पराडा येथे कार्तिक स्वामी भारती बाबांच्या समाधी

सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

श्रीमदब भागवत कथा सप्तदिवसीय लघुरुद्राभिषेक व शिवपंचायत यज्ञ

सोहळ्याने परिसर भक्तिमय १९ नोव्हेंबरला काल्याचे कीर्तन व महाप्रसाद

अंबड प्रतिनिधी : श्रीक्षेत्र वनारशी पराडा येथे ह.भ.प. महंत श्री १००८ ब्रह्मलीन कार्तिक स्वामी भारती बाबा यांच्या तपपूर्ती समाधी सोहळ्या निमित्त अखंड हरिनाम सप्ताह श्रीमदब भागवत कथा, सप्तदिवसीय लघुरुद्राभिषेक व शिवपंचायत यज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. १२ ते १९ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून संपूर्ण परिसर भक्तिमय झाला आहे.श्री ह.भ.प. खडेश्वरी बाबा तुपेवाडी संस्थान व वनारशी संस्थानचे मठाधिपती स्वामी संबित चैतन्य बाबाजी यांच्या प्रेरणेने, वनारशी संस्थान कमिटी तसेच पंचक्रोशीतील भाविक भक्तांच्या सहकार्याने या धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीमदब



भागवत कथेचे निरूपण ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली शिंदे यांच्या अमृततुल्य वाणीतून होत आहे. या कथेसाठी मनोज पाटोळे जय भद्रा बोरवेल, शिवाजी जऱ्हाड शिवसेना तालुकाप्रमुख व नबाजी पाटोळे हे यजमान आहेत.सप्ताहादरम्यान दररोज पहाटे ४ ते ६ काकडा, सकाळी ६ ते ७ विष्णुसहस्रनाम, ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण व रुद्राभिषेक, १० ते १२ श्रीमदब भागवत कथा, दुपारी २.३० ते ४.३० प्रसाद, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, तर रात्री ८ ते १० हरिकीर्तन व त्यानंतर जागरण असे धार्मिक कार्यक्रम होत आहेत. या सप्ताहात १२ नोव्हेंबर रोजी ह.भ.प. कृष्णाजी महाराज नवले, १३ नोव्हेंबर रोजी आयुर्वेदाचार्य ह.भ.प. अवधेशानंद महाराज स्वामी, १४ नोव्हेंबर रोजी ह.भ.प. आत्माराम बाबाशास्त्री कुटे, १५ नोव्हेंबर रोजी उल्हास महाराज सूर्यवंशी, १६ नोव्हेंबर रोजी ज्ञानेश्वर महाराज कुऱ्हाड, १७ नोव्हेंबर रोजी गोपाष्टमीनिमित्त सकाळी नरसिंह महाराज मुकुटकर व रात्री ह.भ.प. प्रशांत महाराज मोरे, तर १८ नोव्हेंबर रोजी ह.भ.प. बापूसाहेब महाराज मोरे देहूकर यांचे कीर्तन होणार आहे. १९ नोव्हेंबरला समाधी सोहळा व काल्याचे कीर्तन गुरुवार, १९ नोव्हेंबर रोजी समाधी सोहळ्यानिमित्त सकाळी ६ ते ८ या वेळेत ह.भ.प. दिनकर महाराज चिमणे यांचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर सकाळी १० ते १२ या वेळेत भरत गिरीजी महाराज यांच्या अमृततुल्य वाणीतून काल्याचे कीर्तन होईल. यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्याचा पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रीमदब भागवत कथा, हरिकीर्तन व समाधी सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वामी संबित चैतन्य बाबाजी, वनारशी संस्थान कमिटी व सप्ताह आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.